विकास व कल्याण

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ,मुंबई.**
**एम.एम.टी.सी. हाऊस, पाचवा मजला, प्लॉट नं. सी २२,**
**ब्लॉक ई - , वांद्रे- कुर्ला संकुल,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .**

**मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री, (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६२ व्या बैठकीचे इतिवृत्त**

*******

**बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००२.**
**दिनांक. :- २६.०३.२०२५ (बुधवार)**
**वेळ :- दुपारी ४.०० वा.**

---

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६१ वी बैठक दि०९.१०.२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. मंडळाची ६२ वी बैठक बुधवार दि. २६.०३.२०२५ रोजी दुपारी ४.०० आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीची विषय सूची खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना उपदान (Gratuity) प्रदान करणेबाबत. | ७ |
| ०२ | केंद्र शासनाकडून प्राप्त आदर्श कल्याणकारी योजना (Model Welfare Scheme) नमूद केल्यानुसार वयाची ६० वर्ष पूर्ण झालेल्या बांधकाम कामगारांकरीता निवृत्तीवेतन योजना राबविण्याबाबत. | ८ ते ९ |
| ०३ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या अटल आवास योजना (शहरी) व अटल आवास योजना (ग्रामिण) योजनेअंतर्गत DBT पध्दतीने थेट लाभ बांधकाम कामगारास अदा करणेबाबत. | १० ते १३ |
| ०४ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी होणाऱ्या बांधकाम कामगारांचे नोंदणी व नुतणीकरण शुल्क माफ करणेबाबत. | १४ ते १५ |
| ०५ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तपशिलाची तपासणी आधार सोबत करणेबाबत. (Adhar Verification) | १६ |
| ०६ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजाकरीता विभागीय व क्षेत्रीय कार्यालयांनी घेतलेल्या भाडे तत्वावरील वाहनाबाबत. | १७ ते १८ |
| ०७ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणे. | १९ ते २० |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०८ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणे. | २१ ते २२ |
| ०९ | **अ.** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२४-२५ चे सुधारित अर्थसंकल्प अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता देणे आणि<br>**ब.** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्प अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता देणे. | २३ ते २४ |
| १० | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे (Annual Statement of Accounts) कामकाजासाठी आणि सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वस्तू, सेवाकर व आयकर विषयक (IT/GST Returns) कामकाजासाठी सनदी लेखापाल/ संस्था यांची नियुक्ती करणेबाबत विचारविनिमय करणे. | २५ ते २६ |
| ११ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील सन २०२४-२५ मधील गुंतवणूक उपसमितीने अतिरिक्त निधीच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये केलेल्या गुंतवणुक (ऑक्टोंबर - फेब्रुवारी) कार्यवाहीस मंजुरी देणे. | २७ ते २९ |
| १२ | मंडळाचे सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल अर्थसंकल्पिय अधिवेशन -२०२५ मध्ये विधानमंडळाच्या पटलावर सादर केल्याचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणे. | ३० ते ३२ |
| १३ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या ०३ आर्थिक वर्षातील विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण (Social Audit) महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण व पारदर्शक सोसायटी, मुंबई या संस्थेमार्फत करून घेणेच्या पुढील आवश्यक कार्यवाहीस मान्यता देणे. | ३३ ते ३५ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १४ | लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणी, नुतणीकरण व लाभ वितरण या सेवा अधिसुचित करून कालावधी निश्चीत करणेबाबत. | ३६ ते ३८ |
| १५ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल व्हॅनव्दारे बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यास मान्यता देणेबाबत. | ३९ ते ४० |
| १६ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावरील कामकाजाकरीता ई-निविदा पध्दतीने कंत्राटी कामगारांच्या नियुक्तीकरीता संस्था निश्चीत करणेबाबत. | ४१ ते ४६ |
| १७ | कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम शिक्षण संस्था व कामगार कल्याण आयुक्त यांचेकडील जागेवर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांच्या कौशल्य वृध्दीकरीता कौशल्य विकास संस्था उभारणीबाबत. | ४७ ते ४९ |
| १८ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजन योजना लागू करणेस तत्वत: मान्यता देणेबाबत. | ५० ते ५१ |
| १९ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरणाची सुधारीत योजना राबविणेबाबत. | ५२ ते ५३ |
| २० | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संच वितरणाची सुधारीत योजना राबविणेबाबत. | ५४ ते ५६ |
| २१ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाच्या निर्देशानुसार क्षयरोग निर्मुलनासाठी मोहिम राबविणेबाबत. | ५७ ते ५८ |

| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २२ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता अतिरिक्त तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत. | ५९ ते ६० |
| २३. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आयटी विषयक कामकाजासाठी DIT पॅनेलवरील सल्लागार सस्था M/s. KPMG Advisory Pvt Ltd. यांचे नियुक्तीबाबत. | ६१ ते ६३ |
| २४. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत जिल्हा कामगार सुविधा केंद्रांचा पाच वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्याने तेथील जागा बदलास व मुदतवाढीस मान्यता देण्याबाबत. | ६४ ते ६७ |
| २५. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत तालुका सुविधा केंद्रात ओळखपत्र प्रिंट करणेसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे कार्ड प्रिंटर उपलब्ध करून देणेबाबत. | ६८ ते ६९ |
| २६. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संच पुरविणेबाबत. | ७० ते ७३ |
| २७. | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय | ७४ |

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २६.०३.२०२५ रोजी संपन्न झालेल्या ६२ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. आकाश फुंडकर, मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६२ वी बैठक बुधवार दिनांक २६.०३.२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| ०१ | मा. ना. श्री. आकाश फुंडकर | मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| ०२ | मा. श्रीम. आय. ए. कुंदन, प्रधान सचिव (कामगार) | शासकीय प्रतिनिधी |
| ०३ | मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | शासकीय प्रतिनिधी |
| ०४ | मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव (कामगार-७) | शासकीय प्रतिनिधी |
| ०५ | मा. श्री. विवेक कुंभार | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली. तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.०१:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना उपदान (Gratuity) प्रदान करणेबाबत**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, उपदान प्रदान अधिनियम १९७२ या अधिनियमाअंतर्गत ज्या आस्थापनेत १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असतील अशा आस्थापनेस सदर अधिनियम लागू आहे तसेच संबंधित आस्थापनेतील कर्मचाऱ्यांच्या सेवा सलग ०५ वर्ष व प्रत्येक वर्षी २४० दिवसांपेक्षा जास्त झाल्यास त्याला प्रत्येक पुर्ण केलेल्या सेवेच्या वर्षाकरिता १५ दिवसाचे वेतन (मूळ वेतन व महागाई भत्ता) उपदान म्हणून अनुज्ञेय आहे. उपदानाची परिगणना ही शेवटच्या प्राप्त होणाऱ्या वेतनानुसार करावी अशी तरतुद आहे.

शासन निर्णय क्र. २०२३/ प्र. क्र. ११४/ कामगार -८ दि. ०५.०७.२०२३ अन्वये मे. एस-२ इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेच्या मनुष्यबळ पुरवठयाकरीता नियुक्ती झाल्याने मे. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. या संस्थेच्या सेवा दि.१७.७.२०२३ पासून समाप्त करण्यात आल्या होत्या. तसेच मे. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. यांनी त्यांचे आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांच्या अनुज्ञेय सर्व रक्कमा वितरीत करण्यात याव्यात व त्याबाबत मंडळाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही, असे दि.१८.०७.२०२४ पत्रान्वये कळविण्यात आले होते.

उपरोक्त नमुद केल्यानुसार मे. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. यांच्या आस्थापनेवर कार्यरत ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा उपदान प्रदान अधिनियमा अंतर्गत सलग ०५ वर्ष व प्रत्येक वर्षी २४० दिवसांपेक्षा जास्त झालेल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना उपदान प्रदान लागू आहे. संबंधित संस्थेकडून उपदान प्रदान देय असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी घेवून त्यानुसार संबंधित संस्थेस प्रति कर्मचारी देय उपदानानुसार रक्कम अदा करणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ६२ (१)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील मे. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. यांचेमार्फत कार्यरत असलेल्या पात्र कंत्राटी कर्मचाऱ्यांना उपदान (Gratuity) प्रदान करण्यात मान्यता देण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०२:- केंद्र शासनाकडून प्राप्त आदर्श कल्याणकारी योजना (Model Welfare Scheme) नमूद केल्यानुसार वयाची ६० वर्ष पूर्ण झालेल्या बांधकाम कामगारांकरीता निवृत्तीवेतन योजना राबविण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, केंद्र शासनाच्या दि.३०.१०.२०१८ रोजीच्या पत्रासह मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१९.३.२०१८ रोजीच्या आदेशानुसार तयार करण्यात आलेल्या आदर्श कल्याणकारी योजना (Model Welfare Scheme) प्राप्त झालेल्या आहेत. सदर पत्रात बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी आरोग्य सहाय्य, शिक्षण, घरकुल, कौशल्य विकास, प्रचार प्रसिध्दी निवृत्तीवेतन इत्यादीबाबत कार्यवाही करणेबाबत नमूद आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १२ अन्वये वयाची १८ वर्ष पुर्ण झालेल्या ते वयाच्या ६० वर्षापर्यंतच्या बांधकाम कामगाराने मागील एका वर्षात किमान ९० दिवस काम केले असल्यास त्याची मंडळामध्ये नोंदणी करण्यात येऊन त्यास दरवर्षी नुतणीकरण करणे आवश्यक आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २२ (ब) मध्ये वयाची ६० वर्ष पुर्ण झालेल्या बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन देण्याची तरतुद आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त आदर्श कल्याणकारी योजना (Model Welfare Scheme) अनु.क्र.७ मध्ये निवृत्तीवेतनाबाबत खालीलप्रमाणे नमूद आहे.

७.१ Considering that pension would constitute a permanent liability which the states may not be able to sustain in the long term, the State Welfare Boards may formulate pension schemes depending upon their financial capacity.

७.२ However, pension should be admissible to only those registered BOC workers who have remained registered for a minimum of १० years. In this regard the State Welfare Board should issue a certificate to the effect that a BOC worker has remained registered for a period of १० years.

त्यामध्ये मंडळाने त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार निवृत्तीवेतन योजना तयार करणेबाबत नमूद आहे. तसेच ज्या बांधकाम कामगारांची मंडळामध्ये किमान १० वर्ष नोंदणी सक्रीय आहे अशा बांधकाम कामगारांना निवृत्तवेतन योजनेचा लाभ देणेबाबत नमूद आहे.

वयाची ६० वर्ष पुर्ण झाल्यानंतर बांधकाम कामगाराची मंडळाकडे नोंदणी अथवा नोंदणीचे नुतणीकरण होत नसल्याने त्यांना मंडळाकडून राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ मिळत नाही. सबब, वृध्दापकाळात त्यांचे जिवन सुकर होऊन हातभार लावण्याच्या दृष्टीने अधिनियमातील तरतुदी व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचा विचार करून तसेच त्याच्या मंडळाकडे नोंदीत असल्याच्या कालावधी विचारात घेऊन त्यास शासन मान्यतेने निवृत्तीवेतन योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.६२ (२)/२०२५ :-**

**इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील तरतुद व केंद्र शासनाकडून प्राप्त आदर्श कल्याणकारी योजना (Model Welfare Scheme) नमूद केल्यानुसार वयाची ६० वर्ष पूर्ण झालेल्या बांधकाम कामगारांकरीता निवृत्तीवेतन योजना राबविण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०३:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राविण्यात येणाऱ्या अटल आवास योजना (शहरी) व अटल आवास योजना (ग्रामिण) योजनेअंतर्गत DBT पध्दतीने थेट लाभ बांधकाम कामगारास अदा करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत शहरी भागातील तसेच ग्रामीण भागातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल बांधकाम कामगार आवास योजना** (ग्रामिण/शहरी) **अनुक्रमे दि.**२९.१०.२०१८ **व दि.**१४.१०.२०१९ **रोजीच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार खालीलप्रमाणे राबविण्यात येत आहे.**

**१. अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) :-**

गृहनिर्माण विभागाच्या दि. ०३.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये बांधकाम क्षेत्रातील नोंदणीकृत कामगारांकरिता विशेष योजना म्हणून प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना राबविण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २९.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील सदनिकेसाठी अर्ज करण्यासाठी बांधकाम कामगाराची पात्रता निश्चित करण्यात आली आहे. सदर योजनेतील पात्र लाभार्थ्यांना व गृह प्रकल्पांना गृहनिर्माण विभागाच्या दि. ०९.१२.२०१५ च्या शासन निर्णयानुसार तसेच राज्य शासनामार्फत वेळोवेळी प्रधानमंत्री आवास योजनेकरिता लागू केलेल्या सवलती देण्यात येतात. त्या व्यतिरिक्त पात्र लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रू. २.०० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान देण्यास मंडळाकडून मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत जिल्हा कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर कामगारांच्या यादीसह प्रस्ताव म्हाडा कार्यालयास पाविण्यात येतो. व म्हाडा कार्यालयाने केलेल्या निधीच्या मागणीअंती प्रति लाभार्थी रू.२.०० लक्ष प्रमाणे निधी म्हाडा कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात येतो.

सदर योजना सुरू झाल्यापासून आजापावेतो खालीलप्रमाणे लाभार्थ्यांची यादी म्हाडा कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| ०१ | पुणे | ६३ |
| ०२ | बीड | १७९ |
| ०३ | सांगली | ७४ |
| ०४ | सातारा | ४३ |
| ०५ | सोलापूर | १७३३ |
| | **एकूण** | **२०९२** |

सदर योजनेची अंमलबजावणी २०१९ पासून करण्यात येत आहे आजअखेर लाभार्थी संख्या २०९२ इतकी आहे.

## २. अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) :-

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. १४.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेस मंजूरी देण्यात आली असून मंडळाकडील नोंदित (सक्रिय) बांधकाम कामगारांना ग्रामीण भागात स्वतःच्या पती/पत्नीच्या नावावरील जागेवर नवीन घर बांधण्यासाठी अथवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्कया घरात रूपांतर करण्यासाठी प्रती लाभार्थी रू. १.५० लक्ष एवढे अनुदान मंडळाकडून संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष यांच्याकडे वर्ग करण्यात येते. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०७.०२.२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीन्वये पात्र बांधकाम कामगारास घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जमीन खरेदी व घरबांधणीच्या अनुषंगीक बाबींसाठी केलेल्या खर्चाच्या प्रतीपूर्तीसाठी मंडळाकडून रू. ५०,०००/- पर्यंतचे अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. अशाप्रकारे प्रती बांधकाम कामगार एकूण ०२ लक्ष एवढी रक्कम मंडळाकडून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांपैकी ग्रामिण भागातील नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांसाठीच्या अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामिण) अंतर्गत केलेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी अपर कामगार आयुक्त/कामगार उपायुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लाभार्थ्यी निवड समिती गठीत करण्यात आली आहे समितीची रचना खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| ०१ | अपर कामगार आयुक्त/कामगार उपायुक्त | अध्यक्ष |
| ०२ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास विभाग | सदस्य |
| ०३ | जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य |
| ०४ | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य-सचिव |

सदर समितीने मंजुर केलेल्या लाभार्थ्यांची यादी मंडळाकडे प्राप्त झाल्यावर मंडळामार्फत रू.१.५० लक्ष याप्रमाणे प्रति लाभार्थी रक्कम राज्य व्यवस्थापन कक्ष ग्राम विकास विभाग यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येते.

मंडळाच्या दि.१४.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) बाबत १.०० लक्ष बांधकाम कामगारांचे जिल्हानिहाय लक्षांक निर्धारित करण्यात आले होते. तसेच मंडळाकडून वर्ग करावयाच्या निधीची मागणी तसेच निधी वर्ग करण्यासाठी बँक खात्याचा तपशील सादर करणेबाबत राज्य व्यवस्थापन कक्षेस कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने राज्य व्यवस्थापन कक्षाने दि.१५.०२.२०१९ अन्वये घरकुल बांधकामाकरीता रू. १००.०० कोटी व प्रशासकीय निधीसाठी रू.४.०० कोटी असे एकूण रू.१०४.०० कोटी वितरीत करण्याबाबत विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने दि.२१.०२.२०१९ रोजी राज्य व्यवस्थापन कक्षास रू.१०४.०० कोटी एवढी रक्कम त्यांनी दिलेल्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.

मा. महालेखापाल यांनी अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत अखर्चित असलेल्या निधीबाबत गंभीर आक्षेप नोंदविले आहे. वित्त विभागाच्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अखर्चित निधी जमा करणे बंधनकारक असताना मोठया प्रमाणात मंडळाचा निधी गुंतून पडला असून अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत अखर्चित असलेला रू.१०१,५७,१५,०००/- इतका निधी अनुज्ञेय व्याजासह त्वरीत मंडळ कार्यालयाकडे वर्ग करण्याबाबत कळविण्यात आले होते तदनंतर राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचेमार्फत सदर निधी मंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबत आदेशही निर्गमित करण्यात आले होते परंतु, सदरची रक्कम अद्यापही मंडळाकडे वर्ग करण्यात आली नाही.

सदर योजना सुरू झाल्यापासून आजापावेतो खालीलप्रमाणे लाभार्थ्यांची यादी राज्य व्यवस्थापन कक्षास सादर करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | राज्य व्यवस्थापन कक्षास पाठविण्यात आलेल्या लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| ०१ | कोल्हापूर | ४१७ |
| ०२ | इचलकरंजी | ०४ |
| ०३ | छ. संभाजीनगर | ६४ |
| ०४ | नांदेड | ०५ |

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | राज्य व्यवस्थापन कक्षास पाठविण्यात आलेल्या लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| ०५ | नागपूर | ०२ |
| ०६ | नाशिक | ०५ |
| ०७ | परभणी | १८ |
| ०८ | पुणे | १५ |
| ०९ | बीड | ०२ |
| १० | बुलढाणा | ०२ |
| ११ | सांगली | १०३ |
| १२ | सोलापूर | १०७ |
| | **एकुण** | **७४४** |

सदर योजनेची अंमलबजावणी २०१९ पासून करण्यात येत आहे आजअखेर लाभार्थी संख्या ७४४ इतकी आहे.

उपरोक्त दोन्ही योजनापोटी अर्थसहाय्याची रक्कम मंडळामार्फत ग्रामविकास विभाग व नगरविकास विभागास हस्तांतरीत करण्यात येत आहे. सबब सदर योजना नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता मंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात येत असल्या तरी त्यांची अंमलबजावणी उपरोक्त दोन्ही विभागामार्फत करण्यात येत आहे. त्या तुलनेने दोन्ही योजनांमध्ये लाभार्थ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे नगरविकास विभाग व ग्रामविकास विभाग यांचा सहभागाच्या अनुषंगाने निर्गमित शासन निर्णय रद्द करून दोन्ही योजना मंडळाच्या इतर DBT (Direct Benefit Transfer) योजनाप्रमाणे राविण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामध्ये अटल आवास योजना (शहरी) व अटल आवास योजना (ग्रामिण) या योजनांमध्ये म्हाडा कार्यालय व राज्य व्यवस्थापन कक्ष यांचेमार्फत देण्यात येणारे अर्थसहाय्य थेट मंडळामार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.६२ (३)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राविण्यात येणाऱ्या अटल आवास योजना (शहरी) व अटल आवास योजना (ग्रामिण) योजनेअंतर्गत DBT पध्दतीने थेट लाभ बांधकाम कामगारास अदा करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०४:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी होणाऱ्या बांधकाम कामगारांचे नोंदणी व नुतणीकरण शुल्क माफ करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामातील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने केंद्रशासनाने इमारत व इतर बांधकाम अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) १९९६ लागू केला असून सदर अधिनियमाच्या कलम १८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करण्यात आले आहे.

उपरोक्त अधिनियमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ अस्तित्वात आलेले आहेत. अधिनियमातील / नियमातील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करण्यात येत असून त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

अधिनियमातील कलम १२ (३) मध्ये खालील प्रमाणे तरतूद नमुद आहे.

Section -१२ (३) Every Application under sub-section (२) Shall be accompanied by such documents together with such fee not exceeding ५० rupees as may be prescribed.

वरील तरतुदीनुसार अनु.क्र.२ मध्ये नमुद मंडळ नियमातील नियम ३३(३)(a) मध्ये नोंदणी अर्जासोबत इतर कागदपत्रांसह मंडळ ठरवेल अशी फी कामगाराने जमा करायची आहे. अशी तरतुद नमुद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम १६ -(१) A Building worker who has been registered as a beneficiary under this act shall, until he attains the age of sixty years, contribute to the fund at such rate per mensesm as may be specified by the state government by notification in the official gazette and different rate of contribution may be specified for different class of building worker.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.१५.०१.२०१८ च्या अधिसुचनेअन्वये दि.३.११.२०११ रोजीची अधिसुचना अधिक्रमित करून अधिनिमाअंतर्गत लाभार्थी म्हणून नोंदणी करण्यात आलेला प्रत्येक बांधकाम कामगार त्याचे वय ६० वर्षाचे होईपर्यत प्रति महा रू. १ (वार्षिक रू. १२) इतके अंशदान मंडळाकडे जमा करेल अशी अधिसुचना निर्गमित करण्यात आली होती.

तदनंतर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम कामगारांची नोंदणी/नुतणीकरण करण्याच्या शुल्काच्या सद्यस्थितीतील रक्कमेत बदल करून सदर शुल्काची रक्क्म रू.१/- इतकी ठेवण्यात आली आहे. तथापि, मंडळाच्या संकेतस्थळावरील विविध कारणांमुळे प्रलंबित अर्जांची संख्या तपासली असता त्यामध्ये नोंदणीचे एकुण ६,०५,०८८ इतके अर्ज बांधकाम कामगारांनी केवळ रूपये १/- न भरल्याने प्रलंबित असल्याचे दिसते. सदरची संख्या मोठी असून केवळ रूपये १/- न भरल्याने संबंधित बांधकाम कामगारांना मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळू शकलेला नाही.

उपरोक्त नमूद केल्यानुसार बांधकाम कामगारांनी भरावयाचे रूपये १/- भरण्यापासून सर्व बांधकाम कामागारांना सुट दिल्यास व नि:शुल्क बांधकाम कामगारांची नोंदणी करावयाची झाल्यास उपरोक्त बांधकाम कामागांराची प्रलंबित नोंदणी प्रक्रिया पुर्ण होईल व त्यांना मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येईल सबब, सद्यस्थितीत बांधकाम कामगारांची नोंदणी/नुतणीकरण नि:शुल्क करणे प्रस्तावित आहे. याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दि.१७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे.

**ठराव क्र.६२(४)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी होणाऱ्या बांधकाम कामगारांचे नोंदणी व नुतणीकरण शुल्क माफ करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०५:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तपशिलाचे आधार सोबत संलग्णीकरण करणेबाबत. (Adhar Verification)**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येऊन त्यांना आर्थिक सहाय्य, शैक्षणिक सहाय्य, सामाजिक सुरक्षा व आरोग्याबाबतच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येतो त्याकरीता माहे जुलै, २०२० पासून संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली असून त्याव्दारे बांधकाम कामगारांना त्यांचे नोंदणी, नुतणीकरण व लाभाबाबतचे अर्ज सादर करता येतात. मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये बहुतांश योजना लाभार्थ्यी बांधकाम कामगारांच्या खात्यामध्ये थेट अर्थसहाय्य (DBT) वितरणाच्या आहेत.

वित्त विभाग शासन निर्णय दि.०८.०६.२०२२ मधील वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या सर्व लाभार्थ्यांचा डेटाबेस तयार करून तो आधारशी संलग्निकृत करण्याबाबत प्राप्त निर्देश आणि मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्यात येत असल्याने बोगस व्यक्तींची नोंद होऊ नये, लाभ चुकीच्या व्यक्तींना जाऊ नये तसेच एकाच योजनेसाठी दुबार लाभ जाऊ नये याकरीता आधारसह मंडळाच्या डेटाबेस संलग्न होणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. ६२ (५)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तपशिलाची तपासणी आधार सोबत करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०६:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजाकरीता विभागीय व क्षेत्रीय कार्यालयांना भाडे तत्वावर वाहन घेणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (सेवाशर्तीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९९६ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यात आले असून मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण करण्यात येऊन त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येतो.

मंडळाचा स्वतंत्र अधिकारी/कर्मचारी वर्ग अस्तित्वात नसल्याने मंडळाचे कामकाज कामगार आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यामार्फत करण्यात येत आहे. मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणात दिवसेदिवस वाढ होत आहे.

मंडळाचे कामकाज जिल्हयाच्या शहरी भागापासून ग्रामिण भागापर्यंत पसरलेले असून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांना तालुका व गाव पातळीवरील बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतणीकरणासाठी व योजनांच्या अंमलबजावणीसाठी दौरे करावे लागतात. त्यामुळे मंडळाचे कामकाज सुलभरीत्या पार पाडणेकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांना वाहनाची आवश्यकता असल्याने मंडळाच्या दि.०४.०९.२०१९ व दि. १२.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत कार्यरत क्षेत्रीय कार्यालयाकरीता ज्या ठिकाणी कामगार विभागाकडून वाहन पुरविण्यात आले नाही अशा क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांनी संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी (R.T.O)यांनी निश्चीत केलेल्या दराने संबंधित विभागाच्या अप्पर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त यांच्या मान्यतेने मासिक भाडयाचे दर व धाव निश्चीत करून प्रथम एक वर्षाकरीता वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून घेण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार मंडळ पत्र दि.२२.०२.२०२३ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तसेच मंडळाचे शासकीय सदस्य यांना आवश्यकतेनुसार मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा व लांब पल्ल्याच्या दौ-यांसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उपरोक्त नमुद केल्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांनी भाडेतत्वावरील वाहन वापरास दिलेली मुदतवाढ

दि.३१.१२.२०२४ रोजी संपुष्टात आलेली असून वाढीव मुदतवाढ दि.३१.०३.२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सबब, दि.३१.०३.२०२५ पर्यंत दिलेल्या वाढीव मुदतवाढीस व दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीत क्षेत्रीय कार्यालयांना उपरोक्त नमूद कार्यपध्दतीनुसार भाडे तत्वावर वाहन वापरास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.६२(६)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजाकरीता क्षेत्रीय कार्यालयांना दि.३१.०३.२०२५ दिलेल्या वाढीव मुदतवाढीस व दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीकरीता भाडे तत्वावरील वाहन वापरास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०७ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (१) अन्वये मंडळाचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे लेखे तयार करणेबाबत तरतूद आहे. अधिनियमाच्या कलम २७ (२ ते ५) मंडळाच्या मान्यतेने, मा. महालेखापालांच्या लेखापरीक्षणानंतर वार्षिक अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याची तरतूद आहे. मंडळाचे सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ वर्षांचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. तदनंतर सन २०२०-२१ अखेरचे लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर केले आहेत. सन २०२१-२२ चे लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) होवून उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन मंडळाकडून सादर केले आहेत. मा महालेखापाल कार्यालयाकडून लेख्यांना मंजुरी प्राप्त होताच अंतिम लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येत आहेत.

सद्या मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे सनदी लेखापाल यांचेकडून तयार व प्रमाणित करून घेण्यात आलेले जमा व खर्चाच्या लेख्यांना मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

मंडळाच्या वार्षिक लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश असतो. अशाप्रकारचे सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ मंडळाचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून त्यास मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सद्या मंडळाचे आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षाचे जमा व खर्चाचे लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल (CA) मे. के. एस. संघवी आणि कंपनी, मुंबई यांचेकडून लेखे तयार व प्रमाणित करून मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदरहू लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहेत. सदर लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च

विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

**सन २०२२-२३ वार्षिक लेखे**

**जमा व खर्चाचा गोषवारा**

**(रू कोटीत)**

| अ.क्र. | जमेची बाब | जमा रक्कम | खर्चाची बाब | खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | उपकर | २४९९.४६ | विविध कल्याणाकारी योजनांवरील खर्च | ४२०५.७६ |
| ०२ | नोंदणी शुल्क | २.३६ | प्रशासकीय खर्च | ९१.९२ |
| ०३ | बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज | ५७९.५८ | घसारा | ०.२० |
| ०४ | इतर जमा | ०.००४ | इतर खर्च | ०.०० |
| | **एकूण जमा** | **३०८१.४०** | **एकूण खर्च** | **४२९७.८८** |

मंडळाचे मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे मा. नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयास सादर करण्याच्या कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर. मा. महालेखापाल कार्यालयाने संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) मध्ये काही आक्षेप उपस्थित केलेस त्यांचे अनुपालन करून परीपूर्ण लेखे इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२ ते ५) अन्वये मंडळाच्या मान्यतेने, वार्षिक मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्याचा" (Annual Account) अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याच्या कार्यवाहीस मंडळाच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्र.६२ (७)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता देणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०८ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (१) अन्वये मंडळाचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे लेखे तयार करणेबाबत तरतूद आहे. अधिनियमाच्या कलम २७ (२ ते ५) मंडळाच्या मान्यतेने, मा. महालेखापालांच्या लेखापरीक्षणानंतर वार्षिक अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याची तरतूद आहे. मंडळाचे सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ वर्षांचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. तदनंतर सन २०२०-२१ अखेरचे लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर केले आहेत. सन २०२१-२२ चे लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) होवून उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन मंडळाकडून सादर केले आहेत. मा महालेखापाल कार्यालयाकडून लेख्यांना मंजुरी प्राप्त होताच अंतिम लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येत आहेत.

सद्या मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे सनदी लेखापाल यांचेकडून तयार व प्रमाणित करून घेण्यात आलेले जमा व खर्चाच्या लेख्यांना मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

मंडळाच्या वार्षिक लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश असतो. अशाप्रकारचे सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ मंडळाचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून त्यास मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सद्या मंडळाचे आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षाचे जमा व खर्चाचे लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल (CA) मे. के. एस. संघवी आणि कंपनी, मुंबई यांचेकडून लेखे तयार व प्रमाणित करून मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदरहू लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहेत. सदर लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च

विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

**सन २०२३-२४ वार्षिक लेखे**

**जमा व खर्चाचा गोषवारा**

**(रू कोटीत)**

| अ.क्र. | जमेची बाब | जमा रक्कम | खर्चाची बाब | खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | उपकर | ३२०८.७६ | विविध कल्याणाकारी योजनांवरील खर्च | ४६४६.७७ |
| ०२ | नोंदणी शुल्क | ०.१८ | प्रशासकीय खर्च | १०७.४८ |
| ०३ | बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज | ७४४.२६ | घसारा | १८.३२ |
| ०४ | इतर जमा | ०.०९ | | |
| | **एकूण जमा** | **३९५३.२९** | **एकूण खर्च** | **४७७२.५७** |

मंडळाचे मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे मा. नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयास सादर करण्याच्या कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर. मा. महालेखापाल कार्यालयाने संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) मध्ये काही आक्षेप उपस्थित केलेस त्यांचे अनुपालन करून परीपूर्ण लेखे इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२ ते ५) अन्वये मंडळाच्या मान्यतेने, वार्षिक मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्याचा" (Annual Account) अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याच्या कार्यवाहीस मंडळाच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्र.६२ (८)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता देणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**



सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०९ :- अ. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२४२५ चे सुधारित अर्थसंकल्प अंदाज पत्रकास मंडळाची मान्यता देणे आणि**
**ब. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२५ २६ चे मूळ अर्थसंकल्प अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षांचे अर्थसंकल्प अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मंडळाने सन २००७-०८ पासून सन २०२४-२५ अखेर आर्थिक वर्षनिहाय मुळ व सुधारीत अंदाजपत्रके तयार करून त्यास वेळोवेळी मंडळाची मान्यता घेतली आहे. सद्या सन २०२४-२५ चे सुधारीत आणि सन २०२५-२६ मुळ अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**अ. मंडळाचे सन २०२४-२५ चे सुधारित अर्थसंकल्प अंदाजपत्रक**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांचे रु. ४,४७,२२१.६२ लाख जमेचे व रु. ४,४७,००४.०१ लाख एवढया खर्चाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मंडळाच्या दि. २२.०३.२०२४ अन्वये, सदर मूळ अर्थसंकल्प अंदाजपत्रक राज्य व केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे. तद्नंतर दि. ०२.०७.२०२४ रोजीच्या मंडळाच्या ६० व्या बैठकीत सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात आली आहे.

शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने, माहे नोव्हें.,२०२४ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा व खर्चावर आधारीत उर्वरीत चारमाही करीता संभाव्य जमा व खर्चाच्या आधारे सन २०२४-२५ चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ब. **सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्प अंदाजपत्रक**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांचा प्रत्यक्ष जमा व खर्च आणि सन २०२४-२५ या चालू वर्षाचे सुधारीत अंदाज या आधारे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

**ठराव क्र.६२ (९)/२०२५:-**

**१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. तसेच मंडळाच्या सन २०२५-२६ या आगामी आर्थिक वर्षाच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१० :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे (Annual Statement of Accounts) कामकाजासाठी आणि सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वस्तू, सेवाकर व आयकर विषयक (IT/GST Returns) कामकाजासाठी सनदी लेखापाल/ संस्था यांची नियुक्ती करणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ (१) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या सल्ल्याने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये मंडळाचे अचूक लेखे व इतर अभिलेख जतन केले जातील आणि मंडळाच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र (Annual Statement of Accounts) तयार केले जाईल अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ मधील कलम ४४ नुसार, मंडळ त्याच्या आर्थिक वर्षाचे लेखे संबंधित आर्थिक वर्ष संपल्यानंतर प्रत्येक वर्षी १ एप्रिल नंतर आणि कमाल ३१ ऑक्टोंबर अखेर संबंधित वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालाच्या प्रती सह केंद्र व राज्य शासनास सादर करेल अशी तरतूद आहे.

सन २००७-०८ ते सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करताना लेखांकनाची विहीत पध्दती आणि अचूकता यामध्ये वाढ होणे आणि मा. महालेखापाल कार्यालयास विहित वेळेत वार्षिक लेखे सादर होण्याच्या दृष्टीने सन २००७-०८ या वर्षांपासून मंडळाचे लेखे तयार करण्यासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ (१) नुसार, तयार करण्यात येत असलेल्या मंडळ लेख्यांचे वार्षिक विवरणपत्रामध्ये जमा व खर्चाच्या बाबी अंतर्गत बांधकाम कामगार उपकर नोंदणी नुतनीकरण शुल्क व इतर महसुली जमा तसेच मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना आणि प्रशासकीय खर्च यांचा समावेश असतो. सन २००७-०८ पासून मंडळाकडील

बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण आणि कल्याणकारी योजनांच्या खर्चामध्ये लक्षनीय वाढ झाल्यामुळे मागील तीन वर्षामध्ये मंडळाच्या अंदाजपत्रक जमा व खर्च रक्कमेमध्येही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मंडळाच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करताना लेखांकनाची विहीत पध्दती आणि अचूकता वाढण्यासाठी सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ अखेर सनदी लेखापालांकडून तयार करून घेण्यात आले आहेत तदनंतर सदर लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून Transaction Audit होवून उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन करून मा. महालेखापाल कार्यालयाने मंजुरी दिलेल्या सन २०१९-२० अखेरचे वार्षिक लेख्यांचे विवरणपत्र शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंडळाचे वार्षिक लेख्यांचे विवरणपत्र तयार करण्यासाठी घेण्यात येत असलेल्या सनदी लेखापालांच्या सेवा समाधानकारक व उपयुक्त असल्याने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचेही लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे.

त्यानुसार उक्त खरेदी प्रक्रीया राबवून मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्याच्या पुढील प्रक्रीयेस मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र.६२ (१०)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखे आणि सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक कामकाजासाठी कार्यालयीन स्तरावर खरेदी समिती गठीत करून दरपत्रकाने खरेदी प्रक्रीया राबवून एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ११:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणाकारी मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीने सन २०२४-२५ मधील ऑक्टोंबर - फेब्रुवारी या काळात मंडळाकडील अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणुक केलेचे कार्यवाहीस मंजुरी देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील जमा उपकर निधीपैकी अतिरिक्त निधीची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक उपसमितीद्वारे गुंतवणूक करण्याचे निर्देश आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील पत्र दि. ०५.०७.२०२१ **अन्वये** गुंतवणुक उपसमितीचे खालीलप्रमाणे पुर्नगठन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | गुंतवणुक उपसमिती | पद |
|---|---|---|
| ०१ | मा. मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष |
| ०२ | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ०३ | उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ०४ | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | सदस्य |

उपरोक्त नमुदप्रमाणे गुंतवणूक उपसमितीने मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वेळोवेळी बैठकांचे आयोजन करून कामकाज पुर्ण केले आहे. त्यास मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये ऑक्टोंबर ते फेब्रुवारी या पाच महिन्याच्या कालावधीत मंडळाकडील अतिरीक्त निधी रू १५०० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक केलेच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व वित्त विभाग,शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाचे गुंतवणूक उपसमितीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर ते फेब्रुवारी या पाच महिन्याच्या कालावधीत उपलब्ध अतिरीक्त निधी रू १५०० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या Non Callable प्रकारातील मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी गुंतवणूकींकरीता ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याकरिता सर्व संबंधित राष्ट्रीयकृत बँकाकडून ऑनलाईन प्रकाराने मायक्रोसॉफ्ट टीम्स या ॲप्लिकेशनवर रेकॉडेड व्हीडीओ कॉन्फरन्सींगव्दारे उपस्थित राहानेची पत्रे व ईमेल्स पाठविण्यात आली.त्यानुसार दि.१५.०१.२०२५ रोजी आयोजित ऑनलाईन बैठकीस ११ राष्ट्रीयकृत बँक प्रतिनिधींनी सहभाग घेतला.बैठकीचे विहित मुदतीत सर्व सहभागी बँकांनी वेळोवेळी आपापल्या खुल्या स्पर्धात्मक सर्वोच्च व्याजदर बोली सादर केल्या. त्यापैकी बोली अंतिम होताना पंजाब नॅशनल बँक, समाचार मार्ग फोर्ट शाखा,मुंबई यांनी ७.९९% द.सा.द.शे. ही त्यांची अंतिम व सर्वोच्च व्याजदर बोली सादर केली. त्यानंतर सर्व सहभागी बँकांना दिलेल्या अंतिम संधीमध्ये युनियन बँक ऑफ इंडीया यांनीही ७.९९% द.सा.द.शे. ही त्यांची अंतिम व्याजदर बोली सादर केली. अन्य कोणत्याही बँकेने त्यांनी यापूर्वी सादर केलेल्या बोलीमध्ये वाढ करून व्याजदर बोली सादर केली नसल्याने पंजाब नॅशनल बँक आणि युनियन बँक ऑफ इंडीया यांनी एकसमान ७.९९% द.सा.द.शे. ही सर्वोच्च अंतिम व्याजदर बोली सादर करणा-या बँका ठरल्या. मा. अध्यक्ष, गुंतवणूक उपसमिती यांचे मान्यतेने आणि सर्व सदस्यांच्या मंजुरीने एकसमान सर्वोच्च अंतिम व्याजदर बोली सादर करणा-या बँकापैकी अंतिम संधीमध्ये खालील तक्त्यात नमुद राष्ट्रीयकृत बँकेने सादर केलेल्या सर्वोच्च व्याजदर बोलीस मान्यता दिली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-(**रु.कोटीत**)

| **अ. क्र.** | **बँकेचे नाव** | **शाखेचे नाव** | **गुंतवणूक दिनांक** | **परिपक्वता दिनांक** | **गुंतवणुक रक्कम** | **व्याजदर द.सा.द. शे.** | **परिपक्वते नंतर प्राप्त होणारी रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पंजाब नॅशनल बँक | समाचार मार्ग मुबंई | १६.०१.२०२५ | १६.०१.२०२६ | १५०० | ७.९९% | १६२३.४८ |
| | | | **एकूण** | | **१५००** | | **१६२३.४८** |

वरीलप्रमाणे, गुंतवणूक उपसमितीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या ऑक्टोंबर,२०२४ ते फेब्रुवारी, २०२५ या पाच महिन्याच्या कालावधीतील मंडळाकडील

अतिरिक्त निधी रू. १५०० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेली गुंतवणूक मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ व दि. १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीस मंडळाची मान्यता घेणे प्रस्तावित आहे. मंडळ मान्यतेनंतर गुंतवणूकीचा अहवाल प्रशासकीय विभागास सादर करणेत येणार आहे.

**ठराव क्र.६२ (११)/२०२५:-**

**मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीने, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ऑक्टोंबर, २०२४ ते फेब्रुवारी, २०२५ या पाच महिन्याच्या कालावधीतील मंडळाकडील अतिरिक्त निधी रू. १५०० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non-Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणूकीच्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल अर्थसंकल्पिय अधिवेशन -२०२५ मध्ये विधानमंडळाच्या पटलावर सादर केल्याचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७(५) अन्वये, मंडळाच्या जमा खर्चाच्या वार्षिक लेख्यांसह स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल विधानमंडळाचे पटलावर सादर करणेचे निर्देश आहेत. सदरहु वार्षिक अहवाल महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम,२००७ मधील नमुना क्र. आठ मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये तयार करण्यात येतो. त्यामध्ये सनदी लेखापाल यांचेकडून तयार करून घेतलेल्या संबंधित वर्षाच्या जमा व खर्चाचे लेखे, मा. महालेखापाल कार्यालयाकडील स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल व त्याचे अनुपालन इ. (मराठी व इंग्रजी भाषेमध्ये) चा समावेश होतो. मंडळाचे सन २००७-०८ ते सन २०१९-२० या वर्षांचे वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर वेळोवेळी सादर केले आहेत. सन २०२०- २१ आणि सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे सनदी लेखापाल यांच्याकडून तयार करून त्यास मंडळाची मान्यता घेणे व त्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून लेखापरीक्षण होवून प्राप्त होणा-या स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल व त्याचे अनुपालन तयार करणे इ. प्रक्रीयेस झालेल्या विलंबाच्या कारणांसह दोन्ही वर्षांचे अहवाल सन २०२५ मधील पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात विधानमंडळाच्या दोन्ही पटलांवर सादर करण्यात आल्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देणेसाठी सदर विषय मंडळ बैठकीत सादर करण्यात आला आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७(५) अन्वये, सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल तयार करण्याच्या अनुषंगाने-

१. मे. के. एस संघवी आणि कं. या सनदी लेखापालांकडून मंडळ लेखे सन २०२०-२१ तयार करून घेण्यात आले.

२. सदर लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालय यांच्याकडून दि. ०६.०२.२०२३ ते २२.०२.२०२३ या कालावधीमध्ये लेखापरीक्षण करण्यात आले. सदर लेखापरीक्षणाच्या स्वतंत्र लेखापरीक्षण अहवालाद्वारे Separate Audit Report (SAR) मा. महालेखापाल कार्यालयाने मंडळ पुर्नरचना / सदस्य नियुक्तीच्या

अनुषंगाने कामगार विभाग यांच्यामार्फत विधी व न्याय विभागाचे अभीप्राय मागणी केली होती.

३. शासन पत्र दि.२६.०२.२०२४ अन्वये विधी व न्याय विभागाने दिलेले अभिप्राय मंडळ पत्र दि.१२.०३.२०२४ अन्वये मा. महालेखापाल कार्यालयास कळविण्यात आले आहे. तदनंतर मा. महालेखापाल कार्यालयाने सन २०२०-२१ च्या मंडळ लेखे प्रत पुनश्च (afresh) सादर करण्यास कळविले.

४. त्यानुसार मंडळ पत्र दि. १८.०६.२०२४ अन्वये, मंडळाने सादर केलेल्या सन २०२०-२१ च्या लेख्यांच्या पुनश्च (afresh) प्रतीच्या अनुषंगाने मा. महालेखापाल कार्यालयाचे पत्र दि. ०९.१०.२०२४ अन्वये स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल (SAR) या कार्यालयास प्राप्त झाला.

५. सदर अहवालावर अनुपालन प्रारूप तयार करून शासन मान्यतेने सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल हिवाळी अधिवेशन -२०२४ मध्ये सादर करणेची प्रक्रीया पुर्ण होवू शकली नाही. सबब, प्रस्तुत अहवाल सन २०२५ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात दि. २०.०३.२०२५ रोजी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आला.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७(५) अन्वये, सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल तयार करण्याच्या अनुषंगाने-

१. सन २०२१-२२ च्या वार्षिक अहवालाच्या अनुषंगाने, मे.. के. एस संघवी आणि कं. या सनदी लेखापालांकडून मंडळ लेखे सन २०२१-२२ तयार करून घेण्यात आले.

२. सदर लेख्यांचे लेखापरिक्षण मा.महालेखापाल कार्यालयाकडून दि. १३.०९.२०२४ ते दि. २७.०९.२०२४ या कालावधीत पूर्ण करण्यात आले.

३. त्यासंदर्भातील प्रारूप लेखापरिक्षण अहवाल (Draft SAR) मंडळास प्राप्त झाला असून मंडळ पत्र दि. २८.०२.२०२५ अन्वये, सदर प्रारूप लेखापरिक्षण अहवालाचे अनुपालन मा.महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आले.

४. मा.महालेखापाल कार्यालयाचे पत्र दि. ०६.०१.२०२५ अन्वये,सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांचे लेख्यांचा अंतिम लेखापरिक्षण अहवाल (SAR) प्राप्त झाला. सदर अहवालात नमुद लेखा आक्षेपांच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल मंडळ पत्र दि.

०७.०३.२०२५ अन्वये मा. महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आला आहे. प्रस्तुत अहवाल सन २०२५ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात दि. २०.०३.२०२५ रोजी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आला.

उपरोक्त नमुदप्रमाणे, मंडळाचे सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल अर्थसंकल्पिय अधिवेशन -२०२५ मध्ये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर सादर करण्यासाठी शासनास सादर करण्यात आले. तदनंतर शासन पत्र दि. १२.०३.२०२५ अन्वये, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवालास शासन मान्यता प्राप्त झाली असून सदर अहवालाच्या प्रत्येकी ७५ प्रती व २५ सी.डी. शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार अहवालाच्या प्रत्येकी ७५ प्रती व २५ सी.डी. शासनास पाठविण्यात आल्या आणि सदरहु अहवाल मा. कामगार मंत्री (कामगार) यांनी विधानमंडळाच्या प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहाच्या पटलावर सादर केल्याचे कार्यवाहीस मंडळाची कार्योत्तर मान्यता व्हावी.

**ठराव क्र. ६२ (१२)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल अर्थसंकल्पिय अधिवेशन -२०२५ मध्ये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर सादर केल्याचे कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १३:-** **मंडळाच्या सन २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या ०३ आर्थिक वर्षातील विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण (Social Audit) महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण व पारदर्शक सोसायटी, मुंबई या संस्थेमार्फत करून घेणेच्या पुढील आवश्यक कार्यवाहीस मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मासर्वोच्च न्यायालयाचे आदेश . आणि श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्रान्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण )Social Audit) करण्याचे निर्देश आहेत त्यानुसार मंडळाचे .सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी टाटा इंस्टीट्यूट ऑफ सोशल सायन्स आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे या दोंन्ही संस्थांनी असमर्थता दर्शविल्याने शासनाच्या नियोजन विभाग अंतर्गत स्थापन महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण तथा पारदर्शक (रोहयो) सोसायटी यांचे मार्फत मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण )Social Audit) करण्यास शासन मान्यता प्राप्त झाली होतीदरम्यान ., मेजिक इन्स्टालॉ. या संस्थेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने .लि.सोल्यूशन्स प्रा शासनाकडून मंडळाकडे दि.०५.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आलेल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सविस्तर अहवालाच्या अनुषंगाने शासन पत्र दि.२८.०८.२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी,मुंबई या संस्थेची नियुक्ती रद्द करून त्याऐवजी मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेच्या नियुक्तीस शासन मान्यता देण्यात आली. तथापि शासन पत्र दि. १२.१२.२०२४ अन्वये, मे.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि या संस्थेचे आदेश रद्द करण्यात आले व पुनश्च महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी यांची नियुक्ती करण्यात आली, सदर संस्थेकडून प्रथमतः प्रायोगिक तत्त्वावर अमरावती व नागपूर या विभागातील सन २०२१-२२ वर्षांमध्ये डीबीटी इन कॅश प्रकारच्या योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यास शासन मान्यता देण्यात आली. त्यानुसार मंडळ पत्र दि.११.०२.२०२५ अन्वये मंडळाच्या सन २०२०-२१, सन २०२१-२२ आणि २०२२-२३ या तीन वर्षांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण व पारदर्शक सोसायटी यांची नियुक्ती करून घेण्याबाबतच्या प्रस्तावास शासन पत्र दि.०७.०३.२०२५ अन्वये शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

मा .सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र .सिव्हील नं.३१८/२००६ च्या संदर्भात दि . १९.०३.२०१८ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र.७५ मध्ये "It would be worthwhile

and relevant for the state Government and Welfare Board and in every state and union territory administration to conduct a Social Audit" असे निर्देश दिले आहेत .

मंडळ पत्र दि.१०.०१.२०२४ अन्वये मंडळ योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी शासनास पाठविलेल्या प्रस्तावास उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे दि.२४.०१.२०२४ पत्रान्वये नियोजन विभागाअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण तथा परदर्शक सोसायटीमार्फत मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यास आणि ज्या जिल्ह्यात सर्वात जास्त बांधकाम कामगार लाभार्थी आहेत, आशा विभागनिहाय प्रत्येकी दोन जिल्ह्यांची निवड मंडळाने करावीमंडळाच्या बांधकाम कामगारां .साठीच्या कल्याणकारी योजनांपैकी ज्या दहा योजनांचा लाभ जास्तीत जास्त कामगारांना देण्यात आला आहे अशा योजनांचे सन २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या तीन आर्थिक वर्षांचे सामाजिक अंकेक्षण करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली.व तसे सोसायटीस कळविण्यात आले .

सोसायटीचे दि.२२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडे सन २०२०-२१,२०२१-२२ आणि २०२२-२३ या वर्षातील सर्वाधिक लाभार्थी असलेल्या सामाजिक अंकेक्षण करावयाच्या एकूण १२ जिल्ह्यांची यादी तसेच सदर पत्रातील नमूद १२ जिल्ह्यांतील १० योजनांवर मागील तीन वर्षांत झालेल्या खर्चाच्या ०.५% निधी सोसायटीस वितरीत करण्याची मागणी करण्यात आली .

दरम्यान, मंडळाची उपकर प्रणाली मे .लि.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा. यांचेमार्फत विकसीत करण्यात येत असल्याने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्याकरीता मेया संस्थेमार्फत उद्योग .लि.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा., ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे दि.०५.०७.२०२४ रोजीच्या प्राप्त पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता .त्यानुसार दि.२८.०८.२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी या संस्थेची नियुक्ती रद्द करून त्याऐवजी मे. इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि. या संस्थेस शासन मान्यता देण्यात आली.

मा. सचिव (रोहयो) यांचेमार्फत शासनास प्राप्त झालेल्या दि.२८.११.२०२४ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार BOCW मंडळाच्या

योजनांचे सामाजिक अंकेक्षण हे राज्यात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीद्वारे करणे बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे. तसेच मंडळाच्या योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्याचे काम खाजगी संस्थेला दिलेले २८.०८.२०२४ रोजीचे आदेश रद्द करून विभागाच्या दि.१३.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार उचित कार्यवाही करण्याबाबत मंडळास सूचना देण्याबाबत शासनास विनंती केली होती.

त्यानुषंगाने,शासन पत्र दिनांक १२.१२.२०२४ अन्वये, मे.इन्स्टालॉजिक सोल्यूशन्स प्रा.लि या संस्थेचे आदेश शासनाकडून रद्द करण्यात आले. महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी यांची पुनश्च नियुक्ती करून सदर संस्थेकडून प्रथमतः प्रायोगिक तत्त्वावर अमरावती व नागपूर या विभागातील सन २०२१-२२ वर्षामध्ये डीबीटी इन कॅश प्रकारच्या योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यास शासन मान्यता देण्यात आली असून मंडळाच्या सन २०२०-२१, सन २०२१-२२ आणि २०२२-२३ या तीन वर्षातील मंडळ योजनांचे सामाजिक अंकेक्षण करून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला.सदर प्रस्तावास दि.०७.०३.२०२५ रोजीच्या शासन पत्राद्वारे मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर शासन मान्यतेच्या अनुषंगाने, मंडळाच्या सन २०२०-२१, सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या तीन वर्षाच्या कालावधीतील विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी सामाजिक अंकेक्षणाची सविस्तर कार्यपद्धती, करारनामा, इत्यादी सविस्तर प्रस्ताव मंडळास तात्काळ सादर करण्यासंदर्भात महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण व पारदर्शक सोसायटी,मुंबई या संस्थेस मंडळ पत्र दि.२१.०३.२०२५ अन्वये कळविण्यात आले आहे.

**ठराव क्र.६२ (१३)२०२५-:**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या तीन आर्थिक वर्षातील विविध कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण महाराष्ट्र सामाजिक अंकेक्षण व पारदर्शक सोसायटी, मुंबई या संस्थेमार्फत करून सदर संस्थेशी सामाजिक अंकेक्षणाची कार्यपद्धती निश्चितीकरण, करारनामा, कार्यारंभ आदेश इत्यादी कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १४ :- लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणी, नुतणीकरण व लाभ वितरण या सेवा अधिसूचित करून कालावधी निश्चीत करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता आणि पात्र व्यक्तींना लोकसेवा देणा-या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दि. २८.०४.२०१५ रोजी अंमलात आणण्यात आला आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वितरण www.mahabocw.in या संगणक प्रणालीवरून बांधकाम कामगारांनी अर्ज सादर केल्यावर अर्जासोबत सादर कागदपत्रांच्या पडताळणीअंती क्षेत्रीय नोंदणी अधिकाऱ्यामार्फत करण्यात येते.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. १२.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत देण्यात येणा-या ऑनलाईन सेवांपैकी किती सेवा लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करता येतील याबाबत अहवाल सादर करण्यासाठी उपसचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. सदर अभ्यासगटाने मंडळामार्फत डीबीटीद्वारे राबविण्यात येणा-या २१ सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसुचित करणे योग्य राहील. तसेच नोंदणी, नुतनीकरण व लाभाच्या अर्जांवर निर्णय घेण्यासाठी नियत कालावधी ३० दिवस एवढा निश्चित करण्यात यावा अशी शिफारस केली आहे. तथापि, मंडळाचे क्षेत्रीय स्तरावरील कामकाज कामगार आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यामार्फत अतिरीक्त स्वरूपात करण्यात येते ही बाब लक्षात घेता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतणीकरण व लाभ वितरणाच्या DBT व्दारे राबविण्यात येणाऱ्या योजना अधिसुचित करून त्यावर निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे कालावधी निश्चीत करावा असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिसूचित करावयाच्या सेवा | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | बांधकाम कामगाराची नोंदणी/नुतणीकरण | प्रत्येकी ६० दिवस |
| ०२ | नोंदीत बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास अंत्यविधी सहाय्य व शववाहिनीव्दारे शव मुळ गावी नेण्यासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य | प्रत्येकी ७ दिवस |
| ०३ | नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यु (वयोगट ५१ ते ६०) झाल्यास रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य | ३० दिवस |
| ०४ | नोंदीत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यु झाल्यास रू.५.०० लक्ष अर्थसहाय्य | ३० दिवस |
| ०५ | नोंदीत बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या यथास्थिती पत्नी/पतीस देण्यात येणारे अर्थसहाय प्रति वर्षी रू.२४०००/- प्रमाणे पाच वर्षाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य | ३० दिवस |
| ०६ | उर्वरीत सर्व DBT योजनांकरीता कालावधी | ९० दिवस |

बांधकाम कामागारांनी उपरोक्त नमूद केल्यानुसार नोंदणी/नुतणीकरण व लाभाचे अर्ज संगणक प्रणालीवर सादर केल्यानंतर तालुका सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यामार्फत छाननीअंती सदर अर्ज नोंदणी अधिकाऱ्याकडे त्यांच्या लॉगइन आयडीवर प्राप्त होतात सबब, नोंदणी अधिकाऱ्यांच्या लॉगइन आयडीवर नोंदणी/नुतणीकरण व लाभाचे अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून उपरोक्त कालावधीची परिगणना करण्यात येईल असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्र.६२ (१४)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणी अधिकाऱ्यांच्या लॉगइन आयडीवर नोंदणी/नुतणीकरण व लाभाचे अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून अर्ज निकाली काढण्यासाठी खालीलप्रमाणे सादर कालावधीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | अधिसूचित करावयाच्या सेवा | कालावधी |
|---|---|---|
| **०१** | **बांधकाम कामगाराची नोंदणी/नुतणीकरण** | **प्रत्येकी ६० दिवस** |
| **०२** | **नोंदीत बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास अंत्यविधी सहाय व शववाहिनीव्दारे शव मुळ गावी नेण्यासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य** | **प्रत्येकी ७ दिवस** |

| अ.क्र. | अधिसूचित करावयाच्या सेवा | कालावधी |
|---|---|---|
| ०३ | नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यु (वयोगट ५१ ते ६०) झाल्यास रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य | ३० दिवस |
| ०४ | नोंदीत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यु झाल्यास रू.५.०० लक्ष अर्थसहाय्य | ३० दिवस |
| ०५ | नोंदीत बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या यथास्थिती पत्नी/पतीस देण्यात येणारे अर्थसहाय प्रति वर्षी रू.२४०००/- प्रमाणे पाच वर्षाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य | ३० दिवस |
| ०६ | उर्वरीत सर्व DBT योजनांकरीता कालावधी | ९० दिवस |

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १५ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल व्हॅनव्दारे बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील बांधकाम कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार विनियमन व सेवाशर्ती), लागू केला १९९६असून सदर अधिनियमान्वये राज्यात बांधकाम कामगारांची सुरक्षा, आरोग्य व कल्याणकारी योजना यांची अंमलबजावणी केली जाते. अधिनियमाच्या कलम १८ अन्वये सन २००७ मध्ये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारीमंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येत असून त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येतो. मंडळाअंतर्गत नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाचा अर्ज संगणक प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यावर संबंधीतास मुळ कागदपत्र तपासणीकरीता, बायोमॅट्रीक व छायाचित्र देणेकरीता संबंधीत तालुका सुविधा केंद्रावर उपस्थित राहणेसाठी दिनांक निवडण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात बांधकामे सुरू असून त्या बांधकाम साईटच्या ठिकाणी कार्यरत बांधकाम कामगारांची संख्या देखील जास्त आहे. तथापि, तुलनेने राज्यातील इतर जिल्हयामधील बांधकाम कामगारांच्या नोंदणी संख्येहुन हे प्रमाण कमी आहे. बांधकाम क्षेत्रातील काम हे स्थलांतरीत स्वरूपाचे असल्याने तेथील बांधकाम कामगार सातत्याने एका बांधकामाच्या साईटवरून दुसरीकडे स्थलांतरीत होत राहतात त्यामुळे मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामाच्या साईटवर जाऊन नोंदणी प्रक्रिया राबविल्यास संबंधित बांधकाम कामगारांना सोईचे होऊन त्यांच्या संबंधित दिवसाच्या वेतनाचे नुकसान होणार नाही व मुळ कागदपत्रांचीही त्याचवेळी तपासणी होईल. व त्याजोगे मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम कामगारांची नोंदणी होण्यासही मदत होईल.

सबब, उपरोक्त नमुद केल्यानुसार व मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्राचा आवाका पाहता बांधकामाच्या साईटवर जाऊन कामगारांची नोंदणी करण्यासाठी सर्व उपकरणांसह व मनुष्यळासह सुसज्ज मोबाईल व्हॅन बांधकामाच्या साईटवर उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्र.६२ (१५)/२०२५:-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत मुंबई व इतर महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल व्हॅनव्दारे बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १६ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावरील कामकाजाकरीता ई-निविदा पध्दतीने कंत्राटी कामगारांच्या नियुक्तीकरीता संस्था निश्चीत करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०३.१०.२०१२ अन्वये, मंडळाच्या मुंबई मुख्यालयाकरीता १८ पदे आणि जिल्हास्तरावर ३८ पदे अशा एकूण ५६ पदांची निर्मिती मंडळस्तरावर करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. शासन अधिसुचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०१.०६.२०१९ नुसार लिपिक-टंकलेखक, अधीक्षक, लघुटंकलेखक (इंग्रजी /मराठी) यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले आहेत. तसेच, दिनांक ०७.०६.२०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार वाहनचालक, दफ्तरी व शिपाई यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले. दिनांक २०.०८.२०२० रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार जिल्हा कार्यकारी अधिकारी व उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले. मंडळाने दिनांक ०५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये १८३ पदे भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नंतर दिनांक २५.११.२०१९ अन्वये ४२२ पद भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. मंडळाच्या दि.१२.१२.२०२२ रोजी संपन्न ५९ व्या बैठकीतील ठरावानुसार ६०२ पदांचा सुधारित आकृतीबंध मा. कामगार आयुक्त यांच्या शिफारशीसह शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता.

मंडळाच्या दि. ०२.०७.२०२४ रोजीच्या ६० बैठकीत मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावर मंडळ कामकाजासाठी ८१३ सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि, त्यास अद्याप शासन मान्यता प्राप्त नाही. सबब, मंडळाकडील विविध पदांच्या सुधारीत आकृतीबंध मंजुरीची प्रक्रिया अद्याप पुर्ण झाली नसल्याने सदर पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याने मंडळाकडील कामकाजाच्या आवश्यकतेनुसार सदर रिक्त पदांच्या सेवा शासन धोरणानुसार बाहयस्त्रोत यंत्रणेकडून घेण्यात येत आहेत.

शासन निर्णय, दिनांक १४.०३.२०२३, दिनांक ०५.०४.२०२३, दिनांक ०९.०५.२०२३ आणि दिनांक ०६.०९.२०२३ अन्वये बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी ०९ सेवा पुरवठादारांच्या पॅनलला मनुष्यबळाच्या वर्गवारीनुसार मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी देण्यात आलेल्या शासन मान्यतेनुसार मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील कामकाजाकरीता मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष, मंडळ यांचे मान्यतेने मंडळ मुख्यालयात एकुण ८१ व ४० जिल्हा सुविधा केंद्राकरीता प्रत्येकी ०८ या प्रमाणे ३२० पदे, ४१ सफाईगार व अतिरिक्त डाटा एंट्री ऑपरेटर ४० अशी एकुण ४८२ पदे भरण्याकरीता उपरोक्त शासन निर्णयातील ०९ सेवापुरवठादारांच्या पॅनलपैकी मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या संस्थेशी मंडळाने दिनांक ११.०७.२०२३ रोजी करारनामा करून मंडळ कार्यादेश दिनांक १८.०७.२०२३ पासून मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये शासन निर्णय दिनांक ०६.०९.२०२३ मधील तरतुदी रद्य करण्यात आल्याने उपरोक्त नमूद शासन नियुक्त ९ पॅनलवरील एजन्सीकडून दिनांक २१.१०.२०२३ पासून मनुष्यबळाच्या सेवा घेता येणार नाहीत. संबंधित विभाग/कार्यालयाने दिनांक २१.१०.२०२३ पासून नऊ महिन्याच्या आत मनुष्यबळाच्या सेवा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होणार नाही अशा रितीने संपूष्टात आणाव्यात असे निर्देश आहेत.

उपरोक्त नमूद केल्यानुसार कामगार विभागाकडून बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवा करणाऱ्या संस्थाची पॅनल नियुक्ती अथवा पर्यायी व्यवस्था झाली नसल्याने मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने कामगार विभागाकडून बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवा करणाऱ्या संस्थाची पॅनल नियुक्ती होईपर्यंतच्या कालावधीकरीता तत्कालीन पॅनलवरील नियुक्त संस्था मे. एस-२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि. यांचेकडून वैध करारनामा कालावधीस अधिन राहून मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्याकरीता मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजी संपन्न बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**ठराव क्र.६० (२८)/२०२४: - मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील लिपिक व गट-ड वर्गीय रिक्त पदांच्या अनुषंगाने शासन धोरणानुसार बाहयस्त्रोत यंत्रणेकडून घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवा शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये दिनांक ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या पॅनलवरील एजन्सी नियुक्तीचा शासन निर्णय रद्द झाल्याने, सदर सेवांकरीता स्वतंत्रपणे प्रक्रिया न राबविता कामगार विभागाकडून नव्याने सुरू असलेल्या बाहयस्त्रोत मनुष्यबळ पुरवठा संस्था पॅनल नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरीता, तत्कालीन पॅनलवरील नियुक्त संस्था मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. यांचेकडून वैध करारनामा कालावधीकरीता मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव पारीत करण्यात आला आहे.**

दरम्यानच्या कालावधीत मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय पातळीवरील मंडळ कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती, मनुष्यबळाची आवश्यकता पाहता नवीन संस्था निश्चित होईपर्यंत सद्यस्थितीतील संस्थेस पुढील ३ महिन्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या मान्यतेने दि.१८.०७.२०२४ व दि.०४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मंडळाच्या दि.०९.१०.२०२४ रोजीच्या संपन्न बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव क्र.६१ (१५)/२०२४: - मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयामध्ये कार्यरत बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन मान्यतेच्या अधिन राहून माहे मार्च, २०२५ पर्यंत अदा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे.**

उपरोक्त नमुद केल्यानुसार ८१३ पदांच्या सुधारीत आकृतीबंधात शासन मान्यता प्राप्त नसल्याने व मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय पातळीवरील मंडळाचे कामकाज दिवसेदिवस वाढत असून बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपामध्ये मध्ये वाढ झालेली दिसून येत असल्याने मंडळ व क्षेत्रीय स्तरावर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावरील वर्ग १ व २ ची पदे शासन मान्यतेने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत कामगार आयुक्त यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत मंडळाचे कामकाज करण्यात येत

आहे. तथापि, क्षेत्रीय स्तरावरील बांधकाम कामगारांना नोंदणी, नुतणीकरण, लाभवाटपाशी संबंधीत अनुषंगिक कामकाज, प्रशासकीय कामकाज, निधी मागणी, अर्थसंकल्पिय कामकाज इत्यादी कामकाजा करीता मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावर कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

उपरोक्त नमुद केल्यानुसार मनुष्यबळ पुरविण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. तथापि, यापुर्वी मंडळाअंतर्गत सद्यस्थितीत बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत भरण्यात आलेली ४८२ पदे, ८१३ पदांचा सुधारित आकृतीबंध व मंडळ तसेच क्षेत्रीय स्तरावर कामकाजासाठी आवश्यक पदे यांची तुलना करुन खालील प्रमाणे मंडळ व क्षेत्रीय स्तरावर कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

| **मंडळ मुख्यालय व जिल्हा कार्यालय तक्ता** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदनाम** | **सद्यस्थितीतील पदांची संख्या** | | **८१३ पदांपैकी कर्मचारी संख्या** | | **सुधारित** | |
| | | **मंडळ मुख्यालय** | **जिल्हा कार्यालय** | **मंडळ मुख्यालय** | **जिल्हा कार्यालय** | **मंडळ मुख्यालय** | **जिल्हा कार्यालय** |
| ०१ | स्वीय सहायक | २ | ० | २ | ० | २ | ० |
| ०२ | अधीक्षक | ० | ० | ५ | ४२ | ५ | ४२ |
| ०३ | वरीष्ठ लिपीक | ६ | ० | १९ | ९६ | १० | ० |
| ०४ | कनिष्ठ लिपीक | १४ | १२० | ३६ | १९२ | २० | ८४ |
| ०५ | वाहनचालक | ६ | ० | ८ | ० | ८ | ० |
| ०६ | संदेशवाहक | ३ | ० | ३ | ० | ३ | ० |
| ०७ | शिपाई | ६ | ४० | ११ | ४२ | ११ | ४२ |
| | **एकुण अ** | **३७** | **१६०** | **८४** | **३७२** | **५९** | **१६८** |

| ८१३ पदांच्या आकृतीबंधा व्यतिरिक्त मंडळ व क्षेत्रीय स्तरावर आवश्यक अतिरिक्त कंत्राटी पदे | | | |
|---|---|---|---|
| **अनु.क्र.** | **पदनाम** | **मंडळ मुख्यालय** | **जिल्हा कार्यालय** |
| ०१ | वरीष्ठ लेखापाल | ५ | ० |
| ०२ | कनिष्ठ लेखापाल | १५ | ४२ |
| ०३ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १० | १२६ |
| ०४ | मदतनीस | ६ | ० |
| ०५ | सफाईगार | ६ | ४२ |
| **एकुण** | | **४२** | **२१०** |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मंडळ कामकाजाकरीता मंडळ व क्षेत्रीय स्तरावर आवश्यक पदनिहाय मनुष्यबळ संख्या खालील प्रमाणे-

| अ.क्र. | पदनाम | मंडळ मुख्यालय | जिल्हा कार्यालय | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|
| ०१ | लघुटंकलेखक (उच्च श्रेणी) | १ | ० | |
| ०२ | लघुटंकलेखक (निम्म श्रेणी) | १ | ० | |
| ०३ | अधीक्षक | ५ | ४२ | |
| ०४ | वरीष्ठ लेखापाल | ३ | ० | ८१३ पदांच्या आकृतीबंधातील उपजिल्हा कार्यकारी अधिकारी ६ पदे, लेखा अधिकारी १ पद, व सहाय्यक लेखा अधिकारी ६ पदे रिक्त असुन सदर पदे भरे पर्यत लेखाविषयक कामकाजाकरीता मंडळ व क्षेत्रीय स्तरावर वरीष्ठ लेखापाल व कनिष्ठ लेखापाल पदांची आवश्यकता आहे. |
| ०५ | कनिष्ठ लेखापाल | १० | ४२ | |
| ०६ | वरीष्ठ लिपीक | १९ | ८४ | |
| ०७ | कनिष्ठ लिपीक | ३६ | १६८ | |
| ०८ | वाहनचालक | ८ | ० | |
| ०९ | दफ्तरी | ३ | ० | |
| १० | सफाईगार | १२ | ४२ | |
| ११ | शिपाई | ११ | ४२ | |
| | **एकुण** | **१०९** | **४२०** | |

ठराव क्र.६२ (१६)/२०२५ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावर मंडळ कामकाजाकरीता एकुण ५२९ इतकी पदे बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने भरणे करीता मंडळ स्तरावरुन ई-निविदा पध्दतीने संस्था  निश्चिती करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १७ :- कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम शिक्षण संस्था व कामगार कल्याण आयुक्त यांचेकडील जागेवर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांच्या कौशल्य वृध्दीकरीता कौशल्य विकास संस्था उभारणीबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, केंद्र शासनाकडून प्राप्त मॉडेल वेलफेअर स्किममध्ये (Model Welfare Scheme) मागील वर्षी जमा उपकराच्या १०% पर्यंत रक्कम कौशल्य वृध्दीकरण प्रशिक्षणावर खर्च करण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना प्राप्त आहेत.

There should be convergence of the skill development activities of the BOCW Board with those of the State Skill Development Missions/Ministry of Skill Development and Entrepreneurship and National Skill Development Corporation so as to maximize benefits to the BOC workers and their dependents and help them upgrade their skills or diversify by acquiring new set of skills.

During such training period the worker should be given financial assistance in the form of stipend & training expenses and such training may be limited to once in 3 years. Skill development may also be provided to the dependents of a BOC worker but that may be without any stipend. The expenses to be incurred under this head in a financial year should not exceed 10% of the cess collected in the previous year.

त्यानुसार मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता कौशल्य विकास वृध्दीकरण योजना मंडळ व शासन मान्यतेने ई- निविदा पध्दतीने अभिव्यक्ती स्वारस्य प्रसिध्द करून नियुक्त संस्थामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत बार बेंडीग, गंवडी काम, सुतार काम, प्लंबींग, रंगकाम, मचाणकाम (Scaffolding) इलेक्ट्रीशीयन व वेल्डर या कामांचे प्रशिक्षण देण्यात येते. सद्यस्थितीत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांच्या कौशल्य वृध्दीकरणाकरीता १४ संस्था पात्र ठरविण्यात आल्या असून त्यांचेमार्फत बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

कौशल्य विकास वृध्दीकरण योजनेअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना १५ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत असून त्याकरीता प्रशिक्षण संस्थाना प्रति बांधकाम कामगार रू.५८८०/- प्रशिक्षण शुल्क देण्यात येते व १५ दिवसांचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून प्रशिक्षणार्थींचे असेसमेंट करण्यात येते. व त्याकरीता प्रति लाभार्थी खर्च रू.६००/- असा आहे. प्रशिक्षणामध्ये ८०% उपस्थितीसह उत्तीर्ण झालेल्या लाभार्थी बांधकाम कामगारास त्याचे वेतन नुकसान भरपाई म्हणून रू.४२००/- (प्रति तास रू.३५ X८ तास X १५दिवस) देण्यात येते.

उपरोक्त केंद्र शासनाकडून प्राप्त Model Welfare Scheme मध्ये नमुद केल्यानुसार आर्थिक वर्षात जमा उपकराच्या कमाल १० टक्यापर्यंत बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबितांच्या कौशल्य वृध्दीकरण योजनेवर खर्च करावयाचा आहे. सदर खर्चामध्ये प्रशिक्षण खर्च, असेसमेंट खर्च व वेतन नुकसान भरपाईचा समावेश आहे. सद्यस्थितीत मंडळामार्फत सुरू असणाऱ्या कौशल्य वृध्दीकरण योजनेमध्ये उपरोक्त खर्चाच्या मर्यादेअंतर्गत एकुण २,१९,८०६ इतक्या बांधकाम कामगारांना प्रशिक्षण द्यायचे आहे. मंडळाअंतर्गत दरवर्षी जमा होणाऱ्या उपकर रक्कमेत वाढ होत आहे.

कामगार विभागाअंतर्गत कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम शिक्षण संस्था यांचेकडे मुंबई व नागपूर येथे कामगारांच्या प्रशिक्षणाकरीता जागा उपलब्ध आहे तसेच कामगार कल्याण आयुक्त यांचेकडे राज्यात कामगार कल्याण केंद्रांच्या जागा उपलब्ध आहेत सदर जागा त्यांनी मंडळास उपलब्ध करून दिल्यास तेथे बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबितांच्या कौशल्य वृध्दीकरणाकरीता प्रशिक्षण केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामध्ये बांधकाम कामागरांच्या प्रशिक्षणाकरीता निवासी प्रशिक्षण केंद्र (१५ दिवस) स्थापन करून ई-निवीदा पध्दतीने सदर केंद्रातील सर्व खर्चासह केंद्र चालविण्याकरीता संस्थेची निवड करणे प्रस्तावित आहे. प्रशिक्षण घेतलेल्या कामगारांचे असेसमेंट सद्यस्थितीतील कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेमार्फत करण्याबाबतचे समन्वयाचे कामकाज देखील संबंधित संस्थेमार्फत करण्यात येऊन प्रशिक्षण व असेसमेंटमध्ये यशस्वी बांधकाम कामगारांना

मंडळामार्फत वेतन नुकसान भरपाई अदा करण्यात येईल असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्र.६२ (१७)/२०२५ :-**

**कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम शिक्षण संस्था व कामगार कल्याण आयुक्त यांचेकडील जागेवर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांच्या कौशल्य वृध्दीकरीता कौशल्य विकास संस्था उभारणीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१८:-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजन योजना लागू करणेस तत्वत: मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र राज्यात नोंदीत बांधकाम कामगारांपैकी मोठया प्रमाणावर बांधकाम कामगार अन्य राज्यातून स्थलांतरीत झालेले आहेत. तसेच ग्रामीण भागातूनही बरेच बांधकाम कामगार रोजगार मिळण्यासाठी शहरात येतात. सदर बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी निवासाची पुरेशी व्यवस्था नसते. तसेच, स्वयंपाक करणेही जिकरीचे ठरते. परिणामी आरोग्याचे व कुपोषणाचे प्रमाण दिसून येते व त्याचा परिणाम बांधकाम कामकाजावरही होतो. यास्तव शासन मान्यतेअंती मंडळाने मध्यान्ह भोजन योजना राबविण्याचा निर्णय घेतला होता.

सन २०१९ पासून टप्याटप्याने मध्यान्ह भोजन योजना सर्व जिल्हयांमध्ये राबविण्यात येत होती. दि.१९.०३.२०१८ अन्वये राबविलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील Request for Proposal (RFP) मधील तरतुदीस पाच वर्षाचा झालेला कालावधी तसेच वित्तीय व प्रशासकीय बाब विचारात घेऊन दि.२३.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने सदर योजना दि.०१.११.२०२३ पासून बंद करण्यात आलेली आहे.

तसेच दि.०१.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्व्ये मध्यान्ह भोजन योजनेत सुधारणा करून नवीन योजनेची रूपरेषा व आखणी तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| ०१ | प्रधान सचिव (कामगार) | अध्यक्ष |
| ०२ | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ०३ | अपर कामगार आयुक्त, पुणे विभाग | सदस्य |
| ०४ | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | सदस्य- सचिव |

नोंदीत बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना पुनश्च सुरू करणेबाबत लोकप्रतिनिधी, कामगार संघटना प्रतिनिधी यांचेकडून वारंवार मागणी प्राप्त होत असल्याने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना ई- निविदा पध्दतीने राबविणे प्रस्तावित आहे. त्याकरीता

मंडळामार्फत नियुक्त सल्लागारांमार्फत निविदा प्रारूप तयार करून ई- निविदा पध्दतीने संस्था निश्चित करणे प्रस्तावित आहे. सबब, नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्र.६२ (१८)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरणाची सुधारीत योजना राबविण्यास तत्वत: मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सन २०१८ पासून सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरण योजना राबविण्यात आली आहे. सदर योजनेकरीता मंडळ व शासन मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढ देऊन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त संस्थेमार्फत क्षेत्रीय स्तरावर सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, शासनाच्या दि.१.१०.२०२४ रोजीच्या शासन पत्रानुसार सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना बंद करणेबाबत निर्देशित केले आहे.

इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम २२ मध्ये (h) नुसार बांधकाम कामगारांकरीता सुरक्षा संच वितरण योजना राबविण्याच्या अनुषंगाने संचालक, सुरक्षा व औद्योगिक संचालनालय यांचेकडून सुरक्षा संचात समाविष्ट करावयाच्या वस्तूबाबत अभिप्राय प्राप्त करण्यात आले व त्यानुसार सुरक्षा संच व अत्यावश्यक संचातील वस्तूंची निश्चितीकरण करून सुरक्षा संचामध्ये प्राटेक्टीव शूज, हेअरिंग प्रोटेक्शन, सेप्टी हेल्मेट, सेप्टी हार्नेस, मास्क, सेप्टी हँड ग्लोव्हज, रिफलेक्टीव जॅकेट आणि अत्यावश्यक संचामध्ये सोलर टॉर्च, मॉस्कीटो नेट, प्लॅस्टीक मॅट, टिफीन बॉक्स, आऊटर बॅग, वॉटर बॉटल, गॅल्वनाईज ट्रंक या वस्तूंचा समावेश करण्यात आला. सदर वस्तूंचे खुल्या बाजारातील उत्पादक/ वितरकांकडून खुल्या दरपत्रकाआधारे दर प्राप्त करून अंदाजित किंमत ठरविण्यात आली आहे. त्यानुसार सदर योजनेच्या ई- निविदेमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या कामकाज व्याप्तीमध्ये सुरक्षा व अत्यावश्यक संच पुरवठा, साहित्य/ संचावर मंडळाचा लोगो चिकटवणे, संचाची (०७ साहित्यासह) पॅकिग करणे, संचाची वाहतूक करणे, संचाची जिल्हा/ तालुकास्तरावर साठवणूक करणे, जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त यादीनुसार संचाचे वितरण करणे, संचाचे वितरण करताना लाभार्थ्यांचा फोटो काढणे व स्वाक्षरी/ अंगठयाचा ठसा घेऊन संच प्राप्त झाल्याची रितसर पावती प्राप्त करणे, लाभार्थ्यांना संच वितरीत केल्यानंतर मंजूर यादीनुसार वितरण केल्याबाबतच्या पावतीची तपासणी जिल्हा कार्यालयाकडून करून घेणे व विभागीय कार्यालयामार्फत मंडळ कार्यालयास सादर करणे या

सर्व बाबींचा समावेश करण्यात आला. त्यानुसार स्पर्धात्मक ई- निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठादारांची निवड करण्यात आली. त्यानुसार पुरवठादाराकडील सुरक्षा संच व अत्यावश्यक संच नमुन्यांचे शासनमान्य प्रयोगशाळेमार्फत तपासणी करून घेण्यात आली होती. मंडळाकडील नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर कॅम्पचे आयोजन करून सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना वेळोवेळी निर्देशित करण्यात आलेले आहे. शासनाच्या दि.१.१०.२०२४ रोजीच्या शासन पत्रानुसार सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना बंद करणेबाबत निर्देशित केले आहे. दि. ३०.११.२०२३ च्या अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ अधिसुचित करण्यात आले असून त्यामध्ये नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरीत करण्याबाबतच्या योजनेचा समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुधारित सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना ई- निविदा पध्दतीने राबविणे प्रस्तावित आहे. त्याकरीता मंडळामार्फत नियुक्त सल्लागारांमार्फत निविदा प्रारूप तयार करून ई- निविदा पध्दतीने संस्था निश्चित करणे प्रस्तावित आहे. तसेच, सदरची सुधारित सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना सुरू करण्यास मान्यता प्रदान करणेबाबत प्रस्ताव सादर. सदर प्रस्तावास बैठकीत मान्यता प्रदान झालेनंतर शासनास प्रस्ताव सादर केला जाईल व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.

**ठराव क्र. ६२ (१९)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुधारित सुरक्षा संच व अत्यावश्यक संच योजना सुरू करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२० :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संच वितरणाची सुधारीत योजना राबविण्यास तत्वत: मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सन २०२४ पासून गृहपयोगी वस्तू संच योजना राबविण्यात आली आहे. सदर योजनेकरीता मंडळ व शासन मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढ देऊन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले होते त्यानुसार नियुक्त संस्थेमार्फत जिल्हा स्तरावर गृहपयोगी वस्तू संच वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे.

दि. ३०.११.२०२३ च्या अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम २०२३ अधिसुचित करण्यात आले असून त्यामध्ये नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वितरीत करण्याबाबतच्या योजनेचा समावेश करण्यात आलेला आहे.

त्यानुसार मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सन २०२४ पासून गृहपयोगी वस्तू संच योजना राबविण्यात येत आहे. गृहपयोगी वस्तू संच योजनेत खालील बाबींचा समावेश आहे.

| अ.क्र. | गृहपयोगी संचातील वस्तू | नग |
|---|---|---|
| ०१ | ताट | ०४ |
| ०२ | वाटया | ०८ |
| ०३ | पाण्याचे ग्लास | ०४ |
| ०४ | पातेले झाकणासह (१२ इंच) | ०१ |
| ०५ | पातेले झाकणासह (१३ इंच) | ०१ |
| ०६ | पातेले झाकणासह (१४ इंच) | ०१ |
| ०७ | मोठा चमचा (भात वाटपाकरीता) | ०१ |
| ०८ | मोठा चमचा (वरण वाटपाकरीता) | ०१ |
| ०९ | पाण्याचा जग (१.५ लीटर) | ०१ |
| १० | मसाला डब्बा (०७ भाग) | ०१ |

| अ.क्र. | गृहपयोगी संचातील वस्तू | नग |
|---|---|---|
| ११ | डब्बा झाकणासह (१४ इंच) | ०१ |
| १२ | डब्बा झाकणासह (१६ इंच) | ०१ |
| १३ | डब्बा झाकणासह (१८ इंच) | ०१ |
| १४ | परात | ०१ |
| १५ | प्रेशर कुकर -०५ लिटर (स्टेनलेस स्टील) | ०१ |
| १६ | कढई (स्टील) | ०१ |
| १७ | स्टीलची टाकी झाकणासह (मोठी) | ०१ |
| | **एकूण** | **३० (तीस)** |

सदर वस्तूंचे खुल्या बाजारातील उत्पादक/ वितरकांकडून खुल्या दरपत्रकाआधारे दर प्राप्त करून अंदाजित किंमत ठरविण्यात आली आहे. त्यानुसार सदर योजनेच्या ई-निविदेमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या कामकाज व्याप्तीमध्ये सुरक्षा व अत्यावश्यक संच पुरवठा, साहित्य/ संचावर मंडळाचा लोगो चिकटवणे, संचाची (०७ साहित्यासह) पॅकिंग करणे, संचाची वाहतूक करणे, संचाची जिल्हा/ तालुकास्तरावर साठवणूक करणे, जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त यादीनुसार संचाचे वितरण करणे, संचाचे वितरण करताना लाभार्थ्यांचा फोटो काढणे व स्वाक्षरी/ अंगठयाचा ठसा घेऊन संच प्राप्त झाल्याची रितसर पावती प्राप्त करणे, लाभार्थ्यांना संच वितरीत केल्यानंतर मंजूर यादीनुसार वितरण केल्याबाबतच्या पावतीची तपासणी जिल्हा कार्यालयाकडून करून घेणे व विभागीय कार्यालयामार्फत मंडळ कार्यालयास सादर करणे या सर्व बाबींचा समावेश करण्यात आला. त्यानुसार स्पर्धात्मक ई- निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठादारांची निवड करण्यात आली. त्यानुसार पुरवठादाराकडील गृहपयोगी वस्तू संच नमुन्यांचे शासनमान्य प्रयोगशाळेमार्फत तपासणी करून घेण्यात आली होती. मंडळाकडील नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर कॅम्पचे आयोजन करून गृहपयोगी वस्तू संच वाटप करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना वेळोवेळी निर्देशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार गृहपयोगी वस्तू संच वितरणाचे कामकाज सुरू आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुधारित गृहपयोगी वस्तू संच योजना ई- निविदा पध्दतीने राबविणे

प्रस्तावित आहे. त्याकरीता मंडळामार्फत नियुक्त सल्लागारांमार्फत निविदा प्रारूप तयार करून ई- निविदा पध्दतीने संस्था निश्चित करणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ६२ (२०)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुधारित गृहपयोगी वस्तू संच योजना सुरू करण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२१ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाच्या निर्देशानुसार क्षयरोग निर्मुलनासाठी मोहिम राबविणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, श्रम व रोजगार मंत्रालय केंद्र सरकार यांच्या दि. २१.०१.२०२५ रोजीच्या पत्रात सोळाव्या BOCW देखरेख समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सर्व राज्ये/केंद्रशासीत प्रदेशामध्ये कामगार विभाग आणि इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाना त्यांनी राज्ये/जिल्हा आणि उपजिल्हा स्तरावर कामगार आणि आरोग्य विभाग यांच्यात धोरणात्मक भागीदारी प्रस्थापित करून क्षयरोग मुक्त भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी १०० दिवसांची मोहिम राबविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त नमुद केल्यानुसार श्रम व रोजगार मंत्रालयाच्या पत्रासह प्राप्त स्वास्थ व परीवार कल्याण विभाग केंद्र सरकार यांचे दि.२१.११.२०२४ रोजीच्या पत्रात क्षयरोग निर्मुलन मोहिम राबवितांना खालीलप्रमाणे कार्यक्रम घेता येईल असे नमूद आहे.

- Engagement of all attached & subordinate offices (DGFSALI, DGMS) Statutory Organisations (ESIC, EPFO), Autonomous Bodies (DTNBWED, VWGNLI) in 100 days campaign.
- Display of IEC materials in all offices.
- Organise TB screening camps through ESIC Hospitals in consultation with State nodal health department.
- Taking Ni-kshay Shapath (pledge) during the period from 27th January to 2nd February 2025 in all organisations.
- Mobilize and engage various industries, trade union organisations, business associations, and other key stakeholders for TB awareness
- Awareness messages on social media of the Ministry.
- Communicate to all state functionaries on TB campaign seeking their support.
- Register Ni-kshay Mitra from various organizations and institutions of Labour & Employment.

ठराव क्र.६२ (२१)/२०२५ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाच्या निर्देशानुसार क्षयरोग निर्मुलनासाठी मोहिम राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता अतिरिक्त तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजीच्या ६० व्या बैठकीत दैनंदिन बांधकाम कामगारांची संख्या वाढत असल्यामुळे तालुका स्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपास गती देण्याकरीता तालुका स्तरावर सुविधा केंद्र स्थापन करण्यास व ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. दि. १४.१२.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्याच्या कामासाठी ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. ई-निविदे अंतर्गत मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. या न्युनत्तम निविदाकारांनी सादर केलेल्या दरास दि.२४.०३.२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदर संस्थेसोबत करारनामा करुन दि.१५.०३.२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहे. नियुक्त संस्थेने एकूण ३५८ तालुका सुविधा केंद्राचे कामकाज पूर्ण केले आहे.

तसेच मंडळाच्या दि.०९.१०.२०२४ रोजीच्या ६१ व्या बैठकीत ठराव क्र.६१(१०)/२०२४ बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी अतिरिक्त तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने, अतिरिक्त ०८ तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले आहेत, नियुक्त संस्थेने अतिरिक्त ०८ तालुका सुविधा केंद्राचे कामकाज पूर्ण केले आहे. सद्यस्थितीत एकूण ३६६ तालुका सुविधा केंद्रांचे काम पूर्ण झाले आहे.

लोकप्रतिनीधी, कामगार व संघटना प्रतिनिधी यांचेडुन अतिरीक्त तालुका सुविधा केंद्र स्थापनेबाबत मागणी प्राप्त होत आहे. तालुका सुविधा केंद्र स्थापनेबाबत ई- निविदेमध्ये अतिरिक्त तालुका सुविधा केंद्राबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

MBOCWW Board intends to setup one Taluka Level Worker Facility Center in each of 358 Taluka in Maharashtra State. However, considering the quantum of construction works and registration of workers, MBOCWW board

may increase or decrease number of Taluka Level Worker Facility Center by 20%.

ई- निविदेतील वरील अटीच्या अनुषंगाने प्राप्त मागणीच्या अनुषंगाने, अतिरिक्त इमारत कामगार तालुका सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला.

**ठराव क्र.६२ (२२)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या मदतीसाठी नागपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अतिरिक्त ०६ इमारत कामगार तालुका कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आयटी विषयक कामकाजासाठी DIT पॅनेलवरील सल्लागार सस्था M/s. KPMG Advisory Pvt Ltd. यांचे नियुक्तीबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. ०१.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये - महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजासाठी सदर पत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील एक वर्षासाठी आणि तंदनंतर मंडळाच्या आवश्यकतेनुसार शासन मान्यतेने पुढील वाढीव कालावधीसाठी शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग दि.०५.१०.२०२३ अन्वये एम्पॅनल केलेल्या M/s. Primus Partners Pvt Ltd या संस्थेची निवड करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्याअंनुषगाने सदर संस्थेसह दिनांक २६.१२.२०२३ रोजी करारनामा करण्यात आला असून करारनाम्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या (दि.२६.१२.२०२३ ते दि.२५.१२.२०२४) कालावधीसाठी ०७ (सात) सल्लागारांची नियुक्ती करून कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले होते.

उपरोक्त नमूद केल्यानुसार सद्यस्थितीत सल्लागारांच्या नियुक्तीचा १ वर्षाचा कालावधी संपुष्टात आलेला असल्याने सद्यस्थितीत बांधकाम कामगाराकरीता कौशल्य वृध्दीकरण (RPL) योजना अंमलबजावणी तसेच मंडळामार्फत जारी करण्यात येणाऱ्या मंडळाच्या निविदा /अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) तयार करणे व इतर IT based अनुषंगीक कामकाजाकरीता सल्लागारांची आवश्यकता असून सबब, उपरोक्त नमूद कामकाजाकरीता माहिती व तंत्रज्ञान सल्लागार नियुक्त करण्यासाठी शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग दि.०५.१०.२०२३ अन्वये सूचिबध्द केलेल्या संस्थामधून निवड प्रक्रिया राबवण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दि.२४.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.०५.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजासाठी माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या दि.०५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचिबध्द केलेल्या संस्थेमधून एका संस्थेची निवड करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयातील नमूद तरतूदी व प्रचलित कार्यपध्दतीनुसार मंडळाने आयटी

विषयक कामकाजाकरीता माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाने सूचिबध्द केलेल्या संस्थामधून एका संस्थेची निवड करण्यासाठी पुढील आवश्यक ती कार्यवाही मंडळ स्तरावरून करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत.

त्यानुषंगाने मंडळाकडील IT Based कामकाजासाठी कामकाज व्याप्ती (Scope of Work) नुसार Principal Consultant (०१), Senior Consultant (०३) व Consultant (०३) अशी एकुण ०७ (**सात**) मनुष्यबळाच्या सेवा आवश्यक आहेत, त्यांचे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **मनुष्यबळ प्रकार** | **प्रस्तावित आवश्यक संख्या** | **मासिक वेतन प्रति मुनष्यबळ (रू.)** | **एका वर्षाचे कालावधीसाठीचा खर्च (रू.)** |
|---|---|---|---|---|
| ०१ | Principal Consultant | ०१ | ४,५४,००० | ५४,४८,००० |
| ०२ | Senior Consultant | ०३ | ३,८५,००० | १,३८,६०,००० |
| ०३ | Consultant | ०३ | ३,४५,००० | १,२४,२०,००० |
| | **एकुण** | **०७** | **११,८४,०००** | **३,१७,२८,०००** |
| | | | | **(३.१७ कोटी)** |

उपरोक्त उल्लेखित शासन निर्णयातील विहित कार्यपध्दतीनुसार एका संस्थेच्या निवडीकरीता Man Month Rate प्रकाराने सेवा घेणेबाबत शासन निर्णयातील संबंधित संस्थांना सादरीकरणासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार M/s. KPMG Advisory Pvt Ltd. ही एकमेव संस्था सदर बैठकीस उपस्थित होती.

शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग दि.०५.१०.२०२३ मध्ये Man Month Rate प्रकाराने संस्था निवड करणेकरीता विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार, M/s. KPMG Advisory Pvt Ltd. या संस्थेने सादर केलेल्या CV सह सादरीकरणाचे (Presentation) मुल्यांकन, बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांनी मंडळाकडील माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजाची व्याप्ती (Scope of Work) च्या अनुषंगाने मुल्यांकन केले आहे.

मंडळाकडील माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजासाठी शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग दि.०५.१०.२०२३ अन्वये गठित सल्लागार संस्थाच्या पॅनलवरील M/s. KPMG Advisory Pvt Ltd. या संस्थेची मंडळाकडील माहिती व तंत्रज्ञान आधारीत विविध कामकाजासाठी उपरोक्त शासन निर्णयातील वैध

कालावधीपैकी करारनाम्याच्या दिनांकापासून पुढील (०३) तीन वर्षाच्या कालावधीसाठी आणि तद्नंतर मंडळाचे आवश्यकतेनुसार, शासन मान्यतेने व माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून वेळोवेळी सूचिबध्द होणाऱ्या सूचिबध्दतेस अधिन राहून पुढील (०२) दोन वर्ष वाढीव कालावधीसाठी निवड करणेस व त्यासंबंधीचा खर्च उपलब्ध प्रशासकीय निधीतुन करणेस दि.२१.०२.२०२५ अन्वये शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास शासनाच्या दि.०५.०३.२०२५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

**ठराव क्र. ६२ (२३)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आयटी विषयक कामकाजासाठी DIT पॅनेलवरील सल्लागार सस्था M/s. KPMG Advisory Pvt Ltd. यांचे नियुक्तीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत जिल्हा कामगार सुविधा केंद्रांचा पाच वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्याने तेथील जागा बदलास व मुदतवाढीस मान्यता देण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळा अंतर्गत बांधकाम कामगारांना मंडळांच्या योजनांची माहिती तसेच बांधकाम कामगारांचे नोंदणी नुतनीकरण इत्यादी कामकाज सुरळीत होण्यासाठी विभाग स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा कामगार सुविधा (एकुण ४४) केंद्र स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. ठराव क्र. ४८(७)/२०१८ जिल्हा कामगार सुविधा केंद्रांसाठी १२०० चौ.फूट व मंडळाच्या विभागीय कार्यालयांसाठी (जिल्हा कामगार सुविधा केंद्रांसह) १८०० चौ. फूट जागेची आवश्यकता आहे. मंडळाने नेमलेल्या पथकांच्या पाहणी अहवालानुसार कामगार कल्याण मंडळ/शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळे / अन्य स्वायत्त मंडळे / खाजगी जागा मालक यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणा-या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानुसार आगामी ५ वर्षांसाठी भाडेतत्वावर घेण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली आहे. अंतर्गत सजावट, विद्युतविषयक बाबींची पुर्तता, आवश्यक सिव्हिल कामे, फर्निचर, रंगरंगोटी आणि केबिन उभारणी ही कामे मंडळामार्फत ई-निविदा पध्दतीने स्वतंत्र संस्थेची निवड करुन करण्यात येणार आहे. नियुक्त संस्थेकडून प्रस्तावित कामे करावयास काही कालावधी लागेल तो पर्यंत आवश्यक फर्निचर व कार्यालयीन साहित्य दरम्यानच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. भाड्याच्या जागेबाबत करावयाच्या करारनाम्याच्या अटी शर्ती वकीलाकडून निश्चित करण्यात याव्यात. त्याकरीता आवश्यक वकील फी अदा कण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानुसार मंडळाच्या वतीने सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधीत संस्था / व्यक्ती सोबत जागा भाड्याने घेणेबाबतचा रितसर करारनामा करावा. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला. सदर पारीत ठराव शासन मान्यतेने सद्यस्थितीत एकुण ३६ जिल्हा कामगार सुविधा केंद्रे कार्यरत आहेत.

माहे जुन २०१९ पासून जिल्हा कामगार सुविधा केंद्र टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. उपरोक्त ठरावात नमुद केल्यानुसार सदर जिल्हा कामगार सुविधा

केंद्र कामगार कल्याण मंडळ/शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळे / अन्य स्वायत्त मंडळे / खाजगी जागा मालक यांच्या जागावर भाडेतत्वावर पाच वर्षाच्या करार कालावधीसाठी कार्यान्वित करण्यात आले होती. त्यापैकी बहुतांश जिल्हा कामगार सुविधा केंद्रांचा करार कालावधी संपुष्टात आला आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.क्र. | विभागिय स्तरावरील कार्यालये | कार्यालयीन जागा करारनामा | |
|---|---|---|---|
| | | आरंभ दिनांक | अंतिम दिनांक |
| ०१ | मुंबई मुख्य कार्यालय | १६.१०.२०१९ | ३०.०६.२०२४ |
| ०२ | अमरावती | ०४.०९.२०१९ | ०३.०९.२०२४ |
| ०३ | छ.संभाजीनगर | ०५.०९.२०१९ | ०४.०९.२०२४ |

## जिल्हा स्तरावरील कार्यालये

| अ.क्र. | विभाग | कार्यालय | आरंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | **कोकण** | मुंबई शहर | २५.११.२०१९ | २४.११.२०२४ |
| ०२ | | मुंबई पुर्व | २६.०१.२०२० | २५.०१.२०२५ |
| ०३ | | रायगड | १५.०६.२०१९ | १४.०६.२०२४ |
| ०४ | | रत्नागिरी | ०१.०२.२०२१ | ३१.०१.२०२४ |
| ०५ | | सिंधुदुर्ग | १६.०१.२०२० | १६.०१.२०२५ |
| ०६ | **पुणे** | सोलापुर | ०५.०९.२०१९ | ०४.०९.२०२४ |
| ०७ | | कोल्हापूर | २४.०१.२०२० | २३.०१.२०२५ |
| ०८ | | सांगली | ३१.०१.२०२० | ३१.०१.२०२५ |
| ०९ | **छ. संभाजीनगर** | लातूर | ०१.०१.२०२० | ३१.०१.२०२५ |
| १० | | बीड | २१.०१.२०२० | २०.०१.२०२५ |
| ११ | | जालना | ०५.०९.२०१९ | ०४.०९.२०२४ |
| १२ | | परभणी | ०१.०३.२०२० | २८.०२.२०२५ |
| १३ | | नांदेड | ०५.०९.२०१९ | ०४.०९.२०२४ |
| १४ | **नागपूर** | भंडारा | ०३.०९.२०१९ | ०२.०८.२०२४ |
| १५ | **अमरावती** | यवतमाळ | १५.०१.२०२० | १४.०१.२०२५ |
| १६ | **नाशिक** | नंदुरबार | ०२.१२.२०१९ | ०१.१२.२०२४ |
| १७ | | अहमदनगर | ०१.०२.२०२० | ३१.०१.२०२५ |

याव्यतिरीक्त इतर जिल्हा सुविधा केंद्राचा कालावधी नजीकच्या काळात संपुष्टात येत आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | विभागिय स्तरावरील कार्यालये | कार्यालयीन जागा करारनामा | |
|---|---|---|---|
| | | आरंभ दिनांक | अंतिम दिनांक |
| ०१ | कोकण आणि मुंबई | ०५.०७.२०२० | ०४.०७.२०२५ |
| ०२ | नागपूर | ०१.०७.२०२० | ३०.०६.२०२५ |
| ०३ | नाशिक | १५.०७.२०२४ | १४.०७.२०२७ |

**जिल्हा स्तरावरील कार्यालये**

| अ.क्र. | विभाग | कार्यालय | आरंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | **कोकण** | पालघर | २४.१२.२०२१ | २३.१२.२०२६ |
| ०२ | **पुणे** | पिंपरी चिंचवड | १०.०६.२०२१ | ०९.०६.२०२६ |
| ०३ | | बारामती | ०१.०१.२०२२ | ३१.१२.२०२६ |
| ०४ | | सातारा | ०१.०५.२०२४ | ३०.०४.२०२८ |
| ०५ | **छ. संभाजीनगर** | हिंगोली | ०१.०१.२०२४ | ३१.१२.२०२९ |
| ०६ | | धाराशिव | ०१.१०.२०२१ | ३०.०९.२०२६ |
| ०७ | **नागपूर** | वर्धा | ०१.०४.२०२४ | ३१.०३.२०२९ |
| ०८ | | गडचिरोली | ०१.१२.२०२० | ३०.११.२०२५ |
| ०९ | | गोंदिया | ०४.१०.२०२१ | ०३.१०.२०२६ |
| १० | **अमरावती** | अकोला | ०१.०५.२०२३ | ३०.०४.२०२६ |
| ११ | | वाशिम | ०१.०४.२०२२ | ३१.०३.२०२७ |
| १२ | | बुलडाणा | ०१.०८.२०२१ | ३१.०७.२०२६ |
| १३ | **नाशिक** | धुळे | ०१.०१.२०२१ | ३१.१२.२०२६ |

उपरोक्त क्षेत्रीय कार्यालयांकडून पुढील कालावधीकरिता मार्गदर्शनपर संदर्भ प्राप्त झाले आहेत. उपरोक्त जिल्हा सुविधा केंद्रासाठी जागाभाडे करार नुतनीकरण करण्यासाठी संबंधित कार्यालयांकडून प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

त्या अनुषंगाने जिल्हा सुविधा केंद्रासाठी जागाभाडे करार संपल्यानंतर त्याच ठिकाणी किंवा अन्य सोयीच्या ठिकाणी जिल्हा सुविधा केंद्रासाठी संबंधीत बांधकामाची / वास्तुची सद्यस्थीती पडताळून जागा भाडयाने घेण्याबाबत प्रचलित कार्यपध्दती अवलंबावी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने मान्य केलेल्या भाडेदरानुसार जागा भाडयाने घेण्याबाबत कार्यवाही करावी. यासंबधी भाडे मंजुरीबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंडळास सादर करणेबाबत सर्व जिल्हा कार्यालयाना कळविणे प्रस्तावित आहे.

तसेच इतर ठिकाणी जिल्हा सुविधा केंद्र पुर्नस्थापित करायचे असल्यास सद्यस्थितीतील फर्निचर तेथुन नवीन ठिकाणी स्थानांतरण करण्याबाबत जिल्हा सुविधा केंद्राना निर्देश दयावे लागतील सद्यस्थितीतील फर्निचर व इतर हार्डवेअर स्थानांतरणासाठी येणारा खर्च प्रशासकीय निधीतून करण्यासाठी जिल्हा सुविधा केंद्राना निधी हस्तांतरित करावा लागेल.

सबब, उपरोक्त जिल्हा कामगार सुविधा केंद्रांचा करारनामा तपशिलास अनुसरून कालावधी संपुष्टात आलेल्या जिल्हा कामगार सुविधा केंद्रांना संबंधित जागा मालकाची सहमती असल्यास पुढील पाच वर्षाच्या कालावधीकरीता व जागा मालकाची सहमती नसल्यास अनुषंगीक खर्चासह जागा हस्तांतरणास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.६२ (२४)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत जिल्हा कामगार सुविधा केंद्रांचा पाच वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्याने आवश्यकता असल्यास तेथील जागा बदलास तसेच मुदतवाढीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.२५ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत तालुका सुविधा केंद्रात ओळखपत्र प्रिंट करणेसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे कार्ड प्रिंटर उपलब्ध करून देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या सुविधेकरिता संगणक प्रणालीत विकसीत करण्यात आलेली आहे. सदर कामकाजाकरीता मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि.या संस्थेची ई-निविदा पध्दतीने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

माहे-जुलै-२०२० पासून बांधकाम कामगाराची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. यामध्ये बांधकाम कामगाराने नोंदणीचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यावर त्याच्या अर्जाची छाननी होवून नोंदणी अधिकाऱ्यामार्फत नोंदणी अर्ज मंजूर करण्यात येतो. त्यांनतर संबंधित बांधकाम कामगाराने नोंदणी फी भरल्यानंतर त्यास स्मार्ट कार्ड (ओळखपत्र) वितरीत करण्यात येते.

बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता जिल्हा व तालुका स्तरावर अनुक्रमे जिल्हा कामगार सुविधा केंद्र व तालुका कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत बांधकाम कामगाराचा नोंदणी अर्ज कागदपत्रांच्या पडताळणीअंती मंजूर झाल्यावर व कामगाराने नोंदणी शुल्क भरल्यावर त्यास जिल्हा कामगार सुविधा केंद्रामधुन स्मार्ट प्रिंट करून मिळत आहे. तथापि, जे कामगार तालुका सुविधा केंद्रांची निवड करून नोंदणी अर्ज संगणक प्रणालीवर सादर करत आहेत अशा कामगारांना देखील त्यांचे स्मार्ट घेण्यासाठी जिल्हा सुविधा केंद्रात भेट घ्यावी लागत आहे. सदर बाब बांधकाम कामगारांकरीता सोयीची नसल्याच्या तक्रारी मंडळास प्राप्त होत आहेत. त्यामुळे प्रत्येक तालुका सुविधा केंद्रात नोंदणीसाठी येणाऱ्या अर्जांच्या प्रमाणानुसार व आवश्यकतेनुसार स्मार्ट कार्ड प्रिंटर उपलब्ध करून दिल्यास कामगारांची गैरसोय होणार नाही.

ठराव क्र.६२ (२५)/२०२५ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत तालुका सुविधा केंद्रात ओळखपत्र प्रिंट करणेसाठी आवश्यकतेनुसार स्मार्ट कार्ड प्रिंटर उपलब्ध करून देणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. २६:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संचाच्या २५.०० लक्ष लक्ष्यांक वाढीबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.१८.०१.२०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये गृहपयोगी वस्तू संच वितरण करण्याच्या योजनेस शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संचाचा पुरवठा खरेदी समितीच्या दि.१८.०३.२०२१ च्या बैठकीत गट क्र.०१ (नागपूर व औरंगाबाद) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती) करीता मे. मफतलाल इंडस्ट्रीज यांचे प्रती संच दर रू.८८२०/- (वस्तू व सेवाकर वगळून) स्विकृती शिफारशीबाबतचा प्रस्ताव शासन निर्णयार्थ दि.२४.११.२०२३ अन्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.०१.१२.२०२३ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.

३. मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. यांचेसोबत दि.२७.१२.२०२३ गट क्र.०१ (नागपूर व औरंगाबाद विभाग) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती विभाग) करीता स्वतंत्र दोन करारनामे करण्यात आले असून गट क्र.०१ (नागपूर व औरंगाबाद विभाग) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती विभाग) करीता दि.२९.०१.२०२४ रोजी स्वतंत्र दोन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

४. नियुक्त संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र. (h) मध्ये अतिरिक्त गृहपयोगी वस्तू संच लक्ष्यांक वाढविणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

And Whereas, as per bid documents submitted by "Agency", and approval accorded to same by Labour Department, Government of Maharashtra vide letter dated 01.12.2023, contract value shall be as below. Further, as per Undertaking submitted by agency as per RFP clause 8.1 " We hereby undertake to supply, deliver and distribute the additional required quantities of the Household item kit, if any as and when directed by MBOCWW Board reserves the right to increase or decrease quantity of Household kit to be distributed, at same until cost per kit and no price escalation shall be permitted for contract period and agency shall have abide by the same

५. मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजीच्या बैठकीत मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संच पुरविण्याच्या लक्षांकात वाढ

करणेबाबत प्रस्ताव चर्चेकरीता सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत मंडळाकडे १६,१३,५६१ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रीय असल्याने सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने व करारनाम्यातील अटीनुसार आवश्यकतेप्रमाणे अतिरीक्त ६,१३,५६१ लक्ष गृहपयोगी संच पुरवठा करण्यासाठी सर्वानुमते मंडळाच्या मान्यतेने शासनास प्रस्ताव सादर करण्याचे ठरले होते. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**ठराव क्र. ६० (३६) (१)/२०२४ :-**

**मंडळाकडे सद्यस्थितीत १६,१३,५६१ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रीय असल्याने सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने व करारनाम्यातील अटीनुसार आवश्यकतेप्रमाणे अतिरीक्त ६,१३,५६१ लक्ष गृहपयोगी संच पुरवठा करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**६.** वरीलप्रमाणे पारित ठरावाच्या अनुषंगाने ६,१३,५६१ बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वाटपाच्या शासनास सादर केलेल्या प्रस्तावास दि.२६.०७.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. यांचेसोबत दि.२८.०८.२०२४ रोजी गट क्र.०१ (नागपूर व औरंगाबाद विभाग) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती विभाग) करीता स्वतंत्र दोन करारनामे करण्यात आले असून गट क्र.०१ (नागपूर व औरंगाबाद विभाग) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती विभाग) करीता दि.२९.०८.२०२४ रोजी स्वतंत्र दोन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**७.** शासनाच्या दि.१२.०७.२०२४ रोजीच्या पत्रानुसार गृहपयोगी वस्तू संचाचे तालुकास्तरावर वितरण करण्याकरीता निर्देशित करण्यात आले होते. त्यामुळे नियमित होणारी बांधकाम कामगार नोंदणी व गृहपयोगी वस्तू संचाची मागणी पाहता तसेच अनु क्र.०४ मधील तरतूद लक्षात घेता, सर्वसाधारणपणे ९,००,००० लक्ष अतिरिक्त गृहपयोगी वस्तू संचाचा प्रस्ताव मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.०३.०९.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. यांचेसोबत दि.२४.०९.२०२४ रोजी गट क्र.०१ (नागपूर व औरंगाबाद विभाग) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती विभाग) करीता स्वतंत्र दोन करारनामे करण्यात आले असून गट क्र.०१ (नागपूर व औरंगाबाद विभाग) व गट क्र.०२ (मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती विभाग) करीता

दि.२४.०९.२०२४ रोजी स्वतंत्र दोन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरित करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाच्या एकूण ९,००,००० इतक्या लक्षांकवाढीच्या प्रस्तावास मंडळाच्या दि.०९.१०.२०२४ रोजीच्या संपन्न ६१ व्या बैठकीत कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे.

८. मा. श्री. कृष्णा खोपडे, आमदार, ५४- पूर्व नागपूर विधानसभा व मा. श्री. समीर मेघे, आमदार हिंगणा विधानसभा, तसेच इतर लोकप्रतिनिधी व बांधकाम कामगार संघटना यांचेमार्फत गृहपयोगी वस्तू संच वितरणाबाबत विनंती प्राप्त झाली आहे. सदर पत्रामध्ये उर्वरित कामगारांच्या नवीन नोंदणी करण्यात आलेल्या बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे नमूद केले आहे. तसेच, सर्व नवीन नोंदीत होणाऱ्या बांधकाम कामगारांना या योजनेचा लाभ देण्यात यावा जेणेकरून हे सर्व बांधकाम कामगार लाभान्वित होतील असे नमूद आहे. (प्रत संलग्न)

९. सद्यस्थितीत नियुक्त संस्थेमार्फत दि.२८.०२.२०२५ अखेर पर्यंत एकूण २५,१३,५६१ पैकी १९,०३,४१८ गृहपयोगी वस्तू संचाचे वाटप करण्यात आले आहे. सद्यस्थितीत मंडळाकडे दि.२८.०२.२०२५ अखेर पर्यंत ५६,३३,९२६ इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. ३१,६८,६०७ इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रिय (जिवीत) आहे. त्यापैकी २१,४४,०५४ इतक्या नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार ज्यांना गृहपयोगी वस्तू संचाचे वितरण अद्यापी प्रलंबित आहे. (जिल्हानिहाय यादी सोबत संलग्न)

**१०.** दि.२८.०२.२०२५ अखेर मंडळाकडे नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची संख्या ३१,६८,६०७ इतकी आहे. सद्यस्थितीत मंडळात ६.०० लक्ष पेक्षा जास्त बांधकाम कामगारांची नोंदणी प्रलंबित असून सदर बांधकाम कामगारांनी नोंदणी फी ची रक्कम अदा केलेनंतर सदरही बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वितरीत करणे सोईचे होईल. त्याअनुषंगाने मंडळात नियमित होणारी बांधकाम कामगार नोंदणी व गृहपयोगी वस्तू संचाकरीता मा. लोकप्रतिनिधी यांची मागणी पाहता तसेच अनु क्र.०४ मधील तरतूद लक्षात घेता, सर्वसाधारणपणे २५.०० लक्ष अतिरिक्त गृहपयोगी वस्तू (गट क्र.०१ नागपूर व औरंगाबाद विभाग करीता १२.५० लक्ष व गट क्र.०२ मुंबई, नाशिक, पुणे व अमरावती विभाग करीता १२.५० लक्ष) संचाची आवश्यकता आहे. सदरचे लक्ष्यांक दि.३१.०३.२०२६ अखेर पूर्ण करणे तसेच, गृहपयोगी वस्तू संचाबाबत अंतिम २५.०० लक्ष लक्ष्यांक वाढीनंतर नव्याने ई-

निविदा करून सदरची योजना राबविणे प्रस्तावित आहे. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव क्र.६२(२६)/२०२५ :-**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरित करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाच्या एकूण २५.०० लक्ष इतक्या अंतिम लक्षांक वाढीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात येऊन शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यास तसेच सदर लक्ष्यांक वाढीनंतर नव्याने ई-निविदा करून सदरची योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. २७ मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय**

**ठराव :- निरंक**